महाराष्ट्र विधानसभा

तिसरे **अधिवेशन**, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरूवार , दिनांक १७ ,डिसेंबर २०१५ / अग्रहायण २६ , १९३७ (शके)

(१)	**शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**		
(२)	**अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**	}	**यांचे प्रभारी विभाग**
(३)	**पर्यावरण मंत्री**		
(४)	**पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**		

प्रश्नांची एकूण संख्या - ८०

शासनाने डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतल्याबाबत

(१) * ३८१८३ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ हा दिवस डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस असल्याने **वाचन प्रेरणा दिन** म्हणून साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास , विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण व्हावी व ती टिकून रहावी तसेच डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे स्फुर्तीदायी लेखन व विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे हा त्यामागील उद्देश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ पासून राज्यात सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना वाचन करण्यासाठी दररोजचा एक तास "वाचू आनंदे" या तासिकेचे आयोजन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उपक्रमाचे निश्चित स्वरुप काय आहे व त्यासाठी शासनाने निधीची तरतुद केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) होय.

(३) व (४) दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शाळेत वाचन कट्टा निर्माण करणे, पुस्तकपेढी तयार करणे, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या किमान एका पुस्तकाचे वाचन करणे तसेच एक व्यक्ती एक पुस्तक भेट, विद्यार्थ्यांसाठी वाचू आनंदे या तासिकेचे आयोजन करणे, परिसरातील लेखक/कवींना विद्यार्थ्यांची संवाद साधण्यासाठी आमंत्रित करणे, पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

करणे, महान व्यक्तींच्या आयुष्यात वाचनामुळे घडलेले संस्कार याविषयाची माहिती **देणे**, **आंतरराष्ट्रीय**, राष्ट्रीय नेते व वाचन यांची उदाहरणे देऊन चर्चासत्रे घडवून **आणणे**, पुस्तकांचे वाटप करुन वाचन दिन व अध्यापन दिन साजरा **करणे**, विद्यार्थ्यांचे गट करुन विविध पुस्तकांवर चर्चासत्रे घडवून **आणणे**, पुस्तके तुमच्या भेटीला अशा कार्यक्रमाचे आयोजन करणे अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत शाळांना सूचीत करण्यात आले होते.

या उपक्रमासाठी सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा स्तरावरील उपक्रमांसाठी उपलब्ध असलेला निधी वापरण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

सावरगाव व टाकळी वतपाठा (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील जिल्हापरिषद शाळेच्या पोषण आहारामध्ये अळया सापडल्याबाबत

(२) * uu३१९९५ uuडॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव व टाकळी वतपाठा (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील जिल्हापरिषद शाळेच्या पोषण आहारामध्ये अळया सापडल्याची ी घटना दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) उक्त शालेय पोषण आहारामुळे तेथील सात विद्यार्थ्यांना उलट्या झाल्या असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) वृत्तपत्रामध्ये अशा स्वरुपाची बातमी प्रसिध्द झालेली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, यामध्ये तथ्य आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, मुरबाड व शहापूर तालुक्यातील पाणी टंचाईबाबत

(३) * uu३१२९२ uuश्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यामध्ये दरवर्षी सर्वात जास्त पाणी टंचाई निर्माण होत असून अंबरनाथ व मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांमध्ये अनियमितता वव गैरव्यवहार झाल्याने ब-याच योजना अपूर्ण असल्याचे माहे **सप्टेंबर**, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास **आले**, हे खरे आहे **काय**,

(२) तसेच शहापूर तालुक्यात पाण्याची तीव्र टंचाई असून सद्य:स्थितीतत९० वाड्यापाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) तसेचच **कोठारे**, **अवकळवाडी**, जळकेवाडी वेल्टा (ता.शहापूर) या आदिवासी गावांसाठी शासनाने सन **२००८-२००९** मध्ये नळपाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे व सदर नळपाणी पुरवठा योजनेची कामे पूर्ण न करता, सदर नळयोजनेसाठी शासनाने मंजूर केलेल्या निधीचा वापर न करता तिचा दुरुपयोग करण्यात आला **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(४) **असल्यास**, उक्त सर्व प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे **काय**, **त्यानुषंगाने** संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत **आहे**,

(५) **असल्यास**, उक्त ठिकाणी पाणी पुरवठा योजना पुर्ण करण्याबाबत तसेचच पाणी टंचाई निवारणार्थ कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**, **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

अंबरनाथ तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता व गैरव्यवहार झालेला नाही. परंतु मुरबाड तालुक्यामध्ये २३ योजनांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) शहापुर तालुक्यात माहे मार्च २०१५ ते जून २०१५ अखेर पर्यंत २३ गावे व ८० पाडे असे एकूण १०३ गावे/पाडयांना १६ टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) सन **२००८-०९** मध्ये कोठारे जळकेवाडी ही योजना लोकसहभागांतर्गत मंजूर करण्यात आली आहे. आवकळवाडी व वेल्टा या ठिकाणी कोणतीही योजना मंजुर करण्यात आलेली नाही.

कोठारे जळकेवाडी योजनेमध्ये अदा करण्यात आलेला शासन **निधी**, प्रत्यक्षात झालेले काम व ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचे बँक खात्यावर शिल्लक असलेली रक्कम यामध्ये तफावत आढळल्याने ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांचेवर गुन्हा दाखल करण्यासाठी किन्हवली पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दाखल करण्यात आला आहे.

(४) मुरबाड तालुक्यातील २३ योजनांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार आढळल्याने त्यापैकी ४ योजनांमध्ये माहे मार्च **२०११**, एका योजनेमध्ये माहे **जानेवारी**, २०१४ एका योजनेमध्ये मे २०१४ व ३ योजनांमध्ये माहे जानेवारी २०१५ मध्ये अशा एकूण ९ योजनांमध्ये संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव आणि तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर योजनांपैकी खांदारे व वेळूक या २ योजनांमध्ये संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने अपहारीत रकमेचे काम पूर्ण करुन योजनेमध्ये पाणी पुरवठा सुरु केला आहे. व खानिवरे ठाकूरवाडी व म्हसा या योजनांमध्ये संबंधित समितीमार्फत अपहारीत रकमेचा भरणा करण्यात आला आहे.

तसेच उर्वरीत १४ योजनांमध्ये अपहारीत रक्कम वसूल करणेबाबतची कार्यवाही सुरु **असुन**, त्यास योग्य प्रतिसाद मिळत असल्याने अद्याप कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नाही.

(५) शहापुर तालुक्यामधील कोठारे जळकेवाडी योजनेबाबत पुढील कार्यवाही किन्हवली पोलीस स्टेशन यांचेकडे प्रलंबित आहे. मुरबाड व शहापुर तालुक्यामध्ये रखडलेल्या सर्व योजनांबाबत विशेष पथका मार्फत

तपासणी सुरु असून आवश्यकतेप्रमाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत देखील सदर योजना पुर्ण होणेच्या दृष्टीने सुनावणी घेण्यात येत असून, त्या अनुषंगाने आवश्यक तत्परतेने कारवाई करण्यात येत आहे.

तसेच टंचाईग्रस्त गाव पाडयांसाठी संभाव्य टंचाईकृती आराखडा तयार करण्यात येत असुन त्यामध्ये प्रामुख्याने टैंकरने पाणी पुरवठा करणे, विंधन विहीर घेणे, नळ पाणी पुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

पिंपळस (ता. भिवंडी, जि.ठाणे) येथील मे.सिटी हर्बल प्रा.लि.या बोगस औषध कंपनीवर केलेल्या कारवाईबाबत

(४) * ५३२०९७ ५५**श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळस (ता. भिवंडी, जि.ठाणे)` गावच्या हद्दीतील जय अंबे भूमीवर्ल्ड मध्ये असलेल्या मे.सिटी हर्बल प्रा.लि.या बोगस औषध कंपनीवर अन्न व औषध प्रशासन व पोलीस यांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास कारवाई करुन बोगस औषध निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या मुकेश लालचंद दाबी, नितीनकुमार भिकाजी शिंदे, आर.के.सिन्हा, रेणुका एस. रॉय अशा चार संचालकांविरोधात गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीमध्ये बेकायदेशीर औषध निर्मितीचा साठा व विक्री गेल्या कित्येक महिन्यांपासून करण्यात येत असून लाखो रुपयांच्या औषधांची विक्री केल्याची बाब तपासात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यातत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे, दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजी अन्न व औषध प्रशासनाकडून सदर कंपनीवर धाड टाकण्यात आली होती.ी तसेच सदर कंपनीचे इन्चार्ज श्री. मुकेश लालचंद दाबी व संचालक नितीनकुमार भिकाजी शिंदे तसेच सदर औषधाचे वितरकक व जबाबदार व्यक्ती आर. के. सिन्हा व रेणुका एस. रॉय. यांच्याविरुध्द दि. १७/१०/२०१५ रोजी कोनगाव पोलिस स्टेशन भिवंडी येथे FIR नोंदविला आहे.````

(२) हे खरे आहे, सदर कंपनी जुलै, २०१५ पासून विना परवाना औषधाचे उत्पादन व विक्री करीत असल्याचे चौकशीत आढळून आले.

(३) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द एफआयआर नोंदविण्यात आला असून, सदर जागेतून रु. ८,५०,०००/- किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. चार नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेण्यात आले असून त्याचा अहवाल प्रलंबित आहे. तपासाअंती या प्रकरणी सर्व संबंधितांविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भणगी (जि.नांदेड) येथील गोदामात प्रमाणापेक्षा जास्त धान्य आढळल्याबाबत

(५) * u३३३८५ uuश्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील भणगी येथील शासकीय गोदामात सुमारे तीन हजार क्विंटल धान्य अधिकचे आढळून आले आहे, प्रत्यक्षात हे धान्य गोदामाबाहेर गेल्याचे परमिटद्वारे दाखविण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातील रेशनचे हजारो क्विंटल गहू नायगाव बाजार तालुक्यातील पंचतारांकित उद्योग वसाहतीतील मैदा कंपनीत राजरोसपणे विकला जात असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे आल्या असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली ी वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) मौजे भणगी (जि.नांदेड) या गावाच्या शिवारात शासकीय गोदाम नाही. यामुळे भणगी येथील शासकीय गोदामात प्रमाणापेक्षा जास्त धान्य आढळून आल्याची बाब संयुक्तिक नाही.

(२) या आशयाच्या तक्रारी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये नांदेड जिल्हयातत प्राप्त झालेल्या आहेत.त

(३) तहसिलदार नायगाव यांनी गठीत केलेल्या पथकाने अचानक कृष्णूर येथील इंडीया ॲग्रो कंपनीमधील धान्याची चौकशी केली असता त्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील धान्य आढळून आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात कोट्यवधी रुपयांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदी नसल्याबाबत

(६) * u३८२८१ uuश्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात कोट्यवधी रुपयांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदीच नसल्याचे लेखा परीक्षण अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठातील विविध विभागांनी कार्याच्या नोंदीच न दिल्याने मोठी अफरातफर झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) नाही.

विद्यापीठातील विविध विभागांनी कार्याच्या नोंदी साठा नोंदवहीत घेतलेल्या आहेत.ततसेच विभागांमार्फत आलेली देयके विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीसह प्रमाणित करण्यात येतात व लेखापरीक्षकांनी तपासणी करुनच देयकांची अदायगी केली जाते.`

(३) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

(४) प्रश्न उद्‌भ् ावत नाही.

राज्यात छप्रवेश व शिक्षण शुल्क विनियमन २०१५छ या कायद्यात बदल करुन तक्रार करण्याचा अधिकार सर्वांना देण्याबाबत

(७) * **u३०६९३ uuश्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अभियांत्रिकी महाविद्यालये विद्यार्थ्यांना प्रवेश देताना विद्यार्थ्यांकडून वारेमाप शुल्क आकारीत असल्याने च्प्रवेश व शिक्षण शुल्क विनियमन २०१५छ या कायद्यात केवळ विद्यार्थी व पालकांना तक्रार करता येत असल्याने संस्थेच्या विरोधात विद्यार्थी व पालक तक्रार करण्याची हिम्मत करीत नसल्यामुळे तक्रार करण्याचा अधिकार सर्वांना द्यावा अशी मागणी काही लोकप्रतिनिधींनी केली असल्याची बाब दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, च्प्रवेश व शिक्षण शुल्क विनियमन २०१५छ या कायद्यात बदल करुन तक्रार करण्याचा अधिकार सर्वांना देण्याबाबत तसेच अशा अभियांत्रिकी महाविद्यालयांवर काही बंधने घालण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षणण संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, दिनांक १७/८/२०१५ रोजी पारीत केला आहे. त्या अधिनियमातील कलम २ च्या उप कलम (ब) मध्ये हितसंबंधित घटक म्हणून व्यवस्थापन, संबंधित संस्थामधील शिकणारे विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा समावेश आहे.

या अधिनियमाद्वारे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकारण व शुल्क नियामक प्राधिकरण स्थापनन करण्यात आले आहे. हा कायदा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित जोपासण्यासाठी प्रामुख्याने तयार केला असून तो शैक्षणिक संस्था, विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या सोयीसाठी करण्यात आला आहे. त्यामुळे एखाद्या शैक्षणिक संस्थेविषयी काही तक्रार असल्यास ती संबंधित विद्यार्थी व त्यांचे पालक यांना संबंधित प्राधिकरणांकडे करणे शक्य आहे. तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांना शास्ती करण्याचा अधिकार प्राधिकरणांना आहे.`

लोकप्रतिनिधी व अन्य संघटना यांच्याकडून ठोस पुराव्यानिशी तक्रार प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने प्राधिकरण स्वत:हूनन तक्रारीची नोंद घेऊन त्याचे निवारण करणे प्राधिकरणास शक्य आहे. याकरीता प्राधिकरणावर अधिनियमाद्वारे निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

राज्यातील १४ वैद्यकीय महाविद्यालयाना पुरेसा

निधी उपलब्ध न झाल्याबाबत

(८) * u३२४५७ uu**श्री.बसवराज पाटील (औसा)** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ वैद्यकिय महाविद्यालयांमध्ये पदवीसाठीची प्रवेश क्षमता ही २१०० असून त्यात ५० जागांची वाढ झाल्यानंतर संबंधित वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाच्या निकषाप्रमाणे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासनाच्या सदरहू १० वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाचा विस्तार व नवीन इमारतींचे बांधकाम यासाठी आगामी ३ वर्षाकरीता वैद्यकीय संचालनालयाने शासनाकडे ८७२ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव यापूर्वीच सादर केला असून सन २०१५-२०१६ या वर्षासाठी मागणी केलेल्या निधीपैकी शासनाने केवळ २१४ कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्यामुळे अपुऱ्या निधीमुळे उक्त महाविद्यालयांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आर्थिकदृष्टया शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वव रुग्णालयामध्ये एम.सी.आय. चे निकष, शैक्षणिक सोयी सुविधा, न्यायालयीन प्रकरणे व रुग्णसेवेकरीता आवश्यक असलेल्या बांधकामाकरीता सन **२०१५-१६** या वर्षात मोठी बांधकामे यासाठी **रु.२६४.५१** कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच डिसेंबर, २०१५ च्या अधिवेशनामध्ये अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

राज्यात शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला अदा करण्याबाबत

(९) * u२९७४६ uu**प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली)** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांना कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक महिन्याच्या एक तारखेलाच वेतन अदा करण्याबाबतचा शालेय शिक्षण विभागाने आदेश दिला असूनही जिल्ह्यातील अनेक कर्मचाऱ्यांना १५ तारीख उलटून गेल्यानंतरही वेतन अदा केले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.शालेय शिक्षण मंत्र्यांना दिनांक २१ एप्रिल, २०१५ च्या दरम्यान लेखी निवेदन

दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बाबीमुळे अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना गृह कर्जाचे तसेच एलआयसीचे हप्ते वेळेत न भरल्यामुळे व्याजाचाही भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे. काही ठिकाणी तांत्रिक अडचणींमुळे एक तारखेला वेतन होत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) शासन परिपत्रक दिनांक १३.८.२०१५ अन्वये शिक्षकांचे वेतन १ तारखेला अदा करण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील रासायनिक सांडपाण्यामुळे जगबुडी, वशिष्ठी नदी व दाभोळ खाडी प्रदुषित झाल्याबाबत

(१०) * ५२८४६४ ५५श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांचे घातक व दुषित सांडपाणी प्रक्रिया न करताच थेट जगबुडी, वशिष्ठी नदी आणि दाभोळ खाडीत तसेच लोटे येथील नाल्यामध्ये सोडण्यात येत असल्यामुळे प्रचंड प्रमाणात मासे व जलचर मृत झाल्याच्या घटना माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान वारंवार निदर्शनास आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सतत मासे मृत पावल्यामुळे मासेमारी करून उदरनिर्वाह भागविणाऱ्या खाडीकिनाऱ्यावरील हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीतील सीईटीपीचे आधुनिकीकरण व विस्तारीकरणासाठी शासनाने रु. २६.५४ कोटींचा निधी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी कारखान्यांच्या मालकांशी संगनमत करुन कारखान्यांवर कारणे दाखवा नोटीसा देण्याव्यतिरिक्त कोणतीही ीकारवाई करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व पर्यावरणाची हानी करणाऱ्या रासायनिक कारखान्यांवर व संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे अंशत: खरे आहे.

सदर औद्योगिक वसाहतीत निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत पुनर्प्रकिया करण्यात येते व हे प्रक्रियाकृत सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार दाभोळ येथील खाडीत ७.४८ कि. मी. लांबीच्या वाहीनीद्वारे उत्सर्जित करण्यात येते.

दिनांक १४ जुलै, २०१५ रोजी तुंबाड येथे तसेच दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१५ रोजी करंबवणे खाडीत मासे मर्तुकीच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.``

(३) हे खरे आहे.`

(४) हे खरे नाही.

(५) एप्रिल २०१४ पासून आजतागायत सदर औद्योगिक वसाहतीतील ०५ उद्योगांना बंदचे आदेश, ४२ उद्योगांना प्रस्तावित निर्देश, १४ उद्योगांना अंतरिम निर्देश आणि १२ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन, भाषणे आणि चरित्र साधने प्रकाशित करण्याबाबत

(११) * ५२८९४४ ५५**डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन, भाषणे आणि चरित्र साधने प्रकाशित करण्यासाठी मा. उच्च शिक्षण मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची कागदपत्रे, हस्तलिखित, पत्रव्यवहार इत्यादी दस्तऐवजाच्या आधारावर आतापर्यंत प्रकाशित करण्यात आलेले २४ खंड संपल्यामुळे नवीन खंड प्रकाशित करण्यासाठी व महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह त्यानंतर तब्बल १४ वर्षे चाललेला न्यायालयीन लढा या संबंधीची दुर्मिळळ कागदपत्रे` शासनाकडे असतानाही त्याचा इतिहास पुस्तकरूपाने लोकांपर्यंत यावा यासाठी लागणारा निधी प्रकाशन समितीकडे उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे याबाबतचे २१ खंड, फोटोबायोग्राफीचा २२ वा खंड व २ सोर्स मटेरीयल प्रकाशीत केलेले आहेत. संपलेल्या काही खंडाचे पुनर्मुद्रण करण्यात येत असून, काही खंडाचे मराठी मध्ये अनुवाद करणे सुरु आहे व यासाठी विशेष घटक योजनेंतर्गत निधी उपलब्ध आहे.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या सदस्य सचिवांनी सादर केलेल्या २० प्रकल्पांची निवड तज्ञ समितीने केली आहे. सदर प्रकल्पांपैकी २ प्रकल्प छपाईसाठी तयार असून निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

मुंबईसह राज्यभरात बोगस डॉक्टर आढळून आल्याबाबत

(१२) * u३०३३९ uuश्री.नसीम खान **(चांदिवली)**, श्री.अब्दुल सत्तार **(सिल्लोड)**, श्री.अमिन पटेल **(मुंबादेवी)**, श्री.अस्लम शेख (मालाड **पश्चिम)**, श्री.कालीदास कोळंबकर **(वडाळा)**, डॉ.संतोष टारफे **(कळमनुरी)**, श्री.पांडुरंग बरोरा **(शहापूर)**, श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा **कळवा)**, श्री.सुरेश लाड **(कर्जत)**, श्री.किसन कथोरे **(मुरबाड)**, श्रीमती मनिषा चौधरी **(दहिसर)** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यभरात शेकडो बोगस डॉक्टर बेकायदेशीरपणे प्रॅक्टीस करीत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) मुंबईतील झोपडपट्ट्यात तसेच वसई-विरार (जि.पालघर) व ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर बोगस डॉक्टरांची संख्या वाढलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वैद्यकीय उपचारात हलगर्जीपणा, उपचारांची वाढीव बिले, अनावश्यक तपासण्या व चुकीचे निदान अशा घटनाही दिवसेंदिवस वाढत असून ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी उक्त डॉक्टरांच्या आरोग्य केंद्रावर छापे टाकून बोगस डॉक्टरांना पकडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बोगस डॉक्टरांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) दिनांक ०१.०१.२०१५ ते दिनांक ३०.१०.२०१५ या कालावधीत राज्यात एकूण १७० अवैध वैद्यक व्यवसायींवर कारवाई करण्यात आली आहे. यापैकी ४७ प्रकरणे बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील आहेत. तथापि, त्यामुळे राज्यातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) नाही.

परंतू, पालघर जिल्ह्यातील बोईसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रफीक नासीर शेख हा व्यक्ती अवैध वैद्यक व्यवसाय करीत असल्याचे आढळून आल्याने त्याच्या विरुध्द बोईसर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामधील काही डॉक्टर गरीब रुग्णांना खाजगी लॅबमध्ये चाचणीसाठी पाठवून कमिशन घेत असल्याबाबत

(१३) * u३६३८८ uuश्री.सुधाकर देशमुख (नागपूर **पश्चिम)**, श्री.कृष्णा खोपडे (नागपूर **पूर्व)**, श्री.विकास कुंभारे (नागपूर **मध्य)**, श्री.सुधाकर कोहळे (नागपूर **दक्षिण)** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामधील काही डॉक्टर गरीब रुग्णांना विशिष्ट खाजगी पॅथालॉजी, मायक्रोबायोलॉजी व बायोकेमेस्ट्री लॅबमधुनच चाचणी करण्यासाठी पाठवूनन २५ ते ५० टक्के कमिशन घेत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास

आली **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, या तीनही लॅबमध्ये एकूण ६० हून अधिक **डॉक्टर**, तंत्रज्ञ व कर्मचारी वर्ग असून त्यावर शासनामार्फत कोट्यवधी रूपयाचा खर्च करण्यात **येतो**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, या तीनही विषयाच्या नमुन्यांची चाचणी एका विशिष्ट खाजगी पॅथालॉजी लॅबमध्ये होत असून त्याबाबतचे कमिशन संबंधित डॉक्टर घेत **असतात**, हे ही खरे आहे **काय**,

(४) **असल्यास**, याबाबत चौकशी करुन त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(५) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

छत्रपती शिवरायांचा अवमान करणारा एनसीईआरटीचा अभ्यासक्रम बदलण्याबाबत

(१४) * ५३५५३९ ५५श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या एनसीईआरटी या मंडळाच्या माध्यमातून इयत्ता ७ **वी**, १० वी आणि १२ वीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकामध्ये भारतीय संस्कृतीविषयी **खोटी**, अवमानकारक माहिती दिल्याने तसेच विशेषतः ७ वीच्या पुस्तकामध्ये अवघ्या पाच ओळींमध्ये शिवरायांचा इतिहास मांडला गेल्याने महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांना छत्रपती शिवरायांच्या इतिहासापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे हा इतिहास बदलण्याची मागणी मा. पर्यावरणमंत्री यांनी दिनांक १८ डिसेंबर २०१४ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्र्यांकडे केली **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी हिंदु जनजागृती समितीसह अनेक हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी मुंबईतील आझाद मैदान येथे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असतांना संतप्त धरणे आंदोलन करून उपरोक्त विषयी मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी लक्ष घालून छत्रपती शिवरायांचा योग्य इतिहास समाविष्ट करण्याची विनंती केली **होती**, हे खरे आहे **काय**, तसेच याबाबत दिनांक १७ ऑगस्ट, **२००८**, दिनांक १३ मार्च, २००९ व दिनांक १५ मे, २०१२ रोजी शासनाला निवेदने दिली **आहेत**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, केंद्र शासनाकडून या संदर्भात काही प्रतिसाद प्राप्त झाला आहे **काय**, नसल्यास शासनाने छत्रपती शिवरायांचा योग्य इतिहास समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१)१ होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर विषयाच्या अनुषंगाने एन.सी.ई.आर.टी.कडे पत्रव्यवहार केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे २५ ते ३० अनधिकृत शाळा शासन मान्यतेविना सुरु असल्याबाबत

(१५) * ध३८५५३ धधश्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे २५ ते ३० अनधिकृत शाळा असून यामधील काही वर्गाना कोणतीही मान्यता न घेता शाळा सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या चमागेल त्याला शाळाछ या धोरणामुळे जिल्ह्यात सर्वत्र शिक्षण संस्थाचे प्रमाण वाढले असल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित शिक्षण संस्थावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुणे शहरातील प्रमुख रुग्णालयामध्ये स्टेंटची खरेदी आणि विक्री यात मोठी तफावत असल्याबाबत

(१६) * ध२९७७१ धधश्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील प्रमुख रुग्णालयामधून ह्रदयाची अँजिओप्लास्टी करुन बसविण्यात येणाऱ्या स्टेंटची खरेदी आणि विक्री यात मोठी तफावत असल्याची माहिती अन्न औषधे द्रव्ये व एफडीए पुणे विभागाने राज्य शासनाला कळविली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने स्टेंटच्या छापील किंमतीपेक्षा एमआरपी जास्त दराने विक्री करणाऱ्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिरवली (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील ग्रामीण पाणीपुरवठा योजना बेकायदेशीरपणे उभारलेल्या वसाहतीमध्ये राबविल्याबाबत

(१७) * ३५७०६ श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवली (ता.अलिबाग, जि.रायगड) गावठाणासाठी मंजूर झालेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ग्रामीण पाणीपुरवठा योजना हद्दीबाहेर बेकायदेशीरपणे उभारलेल्या वसाहतीमध्येदेखील राबविण्यात येत असल्याने व सदर पाणीपुरवठा योजनेच्या कामात गैरव्यवहार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अन्न व औषधे प्रशासनाने मुंबईत नामांकित कंपन्याच्या खोकल्याच्या बनावट औषधांच्या बाटल्या जप्त केल्याबाबत

(१८) * ३८४०९ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सिप्ला, फायझर, रॅनबॅक्सी व स्मायलॅक्स यासारख्या नामांकित कंपन्याच्या रेक्सकॉफ, कोरेक्स, रॅनकोडक्स यासारख्या खोकल्याच्या औषधाच्या १५ हजार बनावट बाटल्या अन्न व औषध विभागाने जप्त केल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे अंशत: खरे आहे.

दि. २६/१०/२०१५ रोजी अन्न आणि औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयातील अधिका-यांनी सिप्ला, फायझर, रॅनबॅक्सी व स्मायलॅक्स यासारख्या नामांकित कंपन्यांच्या रेसफॉक्स, कोरेक्स, रॅनकोडेक्स यासारख्या खोकल्याच्या औषधाचे विनापरवाना अवैधरित्या विक्री/वितरण करीत असल्याने दलाराम पुखराज चौधरी या इसमाकडून १५ हजार बाटल्या काशिमिरा पोलिसांच्या मदतीने जप्त केल्या होत्या. सदर साठयातून कोरेक्स कफ सिरप, रेनकॉफ कफ सिरप व रेक्सकॉफ सिरप या औषधीचे चाचणी व

विश्लेषणासाठी घेतलेले सर्व नमुने प्रमाणित घोषित झाले आहे.

(२) या संदर्भात श्री.दलाराम पुखराज चौधरी यांचेविरुध्द काशिमिरा पोलिस स्टेशन, ठाणे येथे प्रथम खबर अहवाल क्र. ६१०/२०१५ दि. २६/१०/२०१५ नोंदविला आहे व त्यांना पोलिसांनी अटक केली असून, पोलिसांच्या मदतीने अधिक चौकशी व पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील लिबर्टी ऑईल
मिलवर टाकण्यात आलेला छापा

(१९) * ३७९८६ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातीलल लिबर्टी ऑईल मिलवर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर छाप्यात शासनाने मान्यता दिलेल्या साठ्यापेक्षा किती साठा अनधिकृतपणे ठेवल्याचे आढळून आले आहे,

(३) असल्यास, अनधिकृतपणे साठा करुन ठेवणाऱ्या सदर मिलवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय.

(२) सदर ठिकाणी एकूण २९,३४१ मे.टन एवढा आयात केलेला खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला.

(३) जप्त केलेला २९,३४१ मे.टन एवढा खाद्यतेलाचा साठा सूपूर्दनामाद्वारे कंपनीचे ताब्यात ठेवण्यात आलेला आहे.

तपासणीचेवेळी कंपनीने खाद्यतेलाचा हिशोब व अभिलेख उपलब्ध करुन न दिल्यामुळे जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील तरतुदीस अनुसरुन, कंपनीस कारणे दाखवानोटीस बजावण्यात आली असून, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सुनावणी ठेवण्यात आली असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद, नांदुरा, मलकापूर (जि.बुलढाणा) व वारोली (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील पाणी फ्लोराईडयुक्त,
गढूळ व क्षारयुक्त असल्याबाबत

(२०) * २९८८४ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद, नांदुरा व मलकापूरर (जि.बुलढाणा) या तालुक्यातील अनेक गावांतील नागरीकांनी वर्षानुवर्षे गढूळ व क्षारयुक्त पाणी प्यायल्याने त्यांना किडनी व पोटाच्या विकारांनी ग्रासले असून सदर जिल्ह्यात १ हजार ९७३ रुग्णांचे बळी गेले असून जवळपास ३ हजारांहून

अधिक रुग्णांना त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वारोली (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील गावाचे पाणी फ्लोराईडयुक्त असल्याने ते पाणी पिण्यायोग्य नसून त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था करावी अशी सूचना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिनांक १८ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील गावाला जवळच्या पाणी पुरवठा योजनेमधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणी पुरवठा करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व शुध्द पिण्याचे पाणी मिळावे याकरिता ग्रामस्थांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गट विकास अधिकारी, तहसिलदार व पाणीपुरवठा उप अभियंता यांच्याकडे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त गावांना शुध्द पाणी पुरवठा करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खारपाण पट्टयाखालील तालुक्यातील किडनी आजाराच्या रुग्णांचे सर्वेक्षण मार्च ते एप्रिल, २०१०-११, २०१२-१३ व २०१४ मध्ये आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. तथापि, क्षारयुक्त/गढुळ पाणी प्यायल्याने किडनी व पोटाचे विकार होतात हे ठामपणे सांगता येऊ शकत नाही. बुलडाणा जिल्ह्यातील खारपाणपट्टा भागातील रुग्णांचे सर्वेक्षण केले असता शेगाव, संग्रामपूर व जळगांव जामोद या तीन तालुक्यामध्ये किडनी आजार रुग्णांची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे.` गेल्या ५ वर्षात किडनी आजार असलेल्या रुग्णांपैकी मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तालुका	मृत्यू संख्या
१.	जळगांव जामोद	७७
२.	संग्रामपूर	६२
३.	शेगांव	०३
एकूण		१४२

(२) हे खरे आहे.` जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी त्यांच्या दि.१८ जुलै, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मौजे वारली (ता.मानोरा) येथील नाल्याकाठची पाणी पुरवठा विहिर या स्त्रोतामध्ये फ्लोराईडचे प्रमाण मानकापेक्षा जास्त आढळून आल्यामुळे या स्त्रोताचे पाणी पिण्याकरीता वापरण्यात येवू नये व पिण्याचे पाण्याची पर्यायी व्यवस्था करुन सदर स्त्रोतास तात्काळ बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) मौजे वारोली (ता.मानोरा) या गावास प्रादेशिक नळ योजनेतून पाईपलाईन जोडणीद्वारे पाणी पुरवठा

करण्यात यावा, यासाठी ग्रामपंचायतीने दि.२४ जून, २०१५ रोजी ठरावाद्वारे तसेच संबंधीत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मानोरा व उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, मानोरा यांनी जिल्हा परिषद, वाशिम यांना पत्राद्वारे कळविले आहे. याशिवाय सदर प्रकरणी कारंजा-मानोरा विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा परिषद, वाशिम यांना दि.२५ ऑक्टोबर, २०१५५ रोजी पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कळविले आहे.

(४) बुलडाणा जिल्ह्यात खारपाणपट्टयात एकूण १६६ गावांचा समावेश असून त्यापैकी ६ गावे उजाड आहेत. १६० गावांपैकी १०२ गावे हाताळण्यात आली असून ०८ गावे सन २०१५-१६ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावर आहेत. १३ गावे हिंगणेगव्हाड प्रादेशिक योजनेत समाविष्ट असून ९ गावे तिव्हाण प्रादेशिक योजनेत समाविष्ट आहेत. हाताळावयाची असलेल्या २८ गावांचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत १४० गावे प्रादेशिक योजनेत करण्यात आला असून सदर योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.`मौजे वारोली, ता.मानोरा, जि.वाशिम या गावाकरीता पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करण्यासाठी भूजल शास्त्रीय सर्वेक्षण केले असता नळ योजनेच्या उद्‌भवासह गाव परिसरातील इतर स्त्रोत फ्लोराईड व क्षारयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यामुळे या गावाचा समावेश सन २०१५-१६ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या वार्षिक कृती आराखड्यात करण्यात आला असून सद्य:स्थितीत जिल्हा परिषदेमार्फत गावाकरीता पाईपलाईन जोडणी व नळपाणी पुरवठा योजना दुरुस्तीकरीता जिल्हा परिषद फंडातून रुपये ३ लक्षची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

माळशिरस (जि.पुणे) पंढरपूर रोडवर श्रीराम शिक्षण संस्थेच्या स्कुल बसला झालेला अपघात

(२१) * **u३२९९४ uuश्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.पुणे) पंढरपूर रोडवर श्रीराम शिक्षण संस्थेच्या स्कुल बसला दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास अपघात होऊन २ विद्यार्थी ठार व ६ विद्यार्थी जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय व तद्नुसार सदर घटनेत मृत झ ाालेल्या मुलांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना औषधोपचाराकरिता कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अपघात स्कुल बसचा चालक व टेम्पो चालक यांच्या निष्काळजीपणामुळे घडल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. दोन्ही वाहन चालकांविरुध्द माळशिरस पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११६/१५ नुसार भा.दं.वि.कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का.कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

मृत व जखमी विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना मोटार अपघात दावा न्यायाधिकरणात नुकसान भरपाई दावा दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पिंपळखुटा (ता.मोताळा,जि.अकोला) येथे रेशनचे धान्य खुल्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना जप्त केल्याबाबत

(२२) * ५३५१३३ **श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम)** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळखुटा (ता.मोताळा,जि.अकोला) येथे खुल्या बाजारात विक्रीसाठी घेऊन जात असलेला साडे सोळा लाखांचा रेशनचा माल पोलीस प्रशासनाने जप्त करुन पाच जणांना ताब्यात घेतल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेशनचे धान्य खुल्या बाजारात विक्री करणारे अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२), (३) व (४) पिंपळखुटा (ता.मलकापुर, जि.बुलडाणा) येथे खुल्या बाजारात विक्रीसाठी घेऊन जात असलेला साडे सोळा लाखांचा रेशनचा अन्नधान्यचा साठा जप्त केला. सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या ५ जणांविरुध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ कलम ३ व ७ (२) अन्वये गुन्हा रजि. क्र. ३०२४/२०१५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबधीत रास्तभाव दुकानदाराचे प्राधिकारपत्र दिनांक २२/९/२०१५ रोजी रद्द करण्यात आले आहे.

इचलकरंजी (जि.कोल्हापूर), मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील सीमावर्ती भागात व पाचोड (ता. पैठण, जि.औरंगाबाद) तसेच जालना येथे जप्त करण्यात आलेला गुटखा

(२३) * ५३१०१२ **डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अर्जुन खोतकर (जालना)** : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटख्यावर बंदी असतानाही इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील सीमावर्ती भागात अन्न व औषध प्रशासन विभागाने चालू आर्थिक वर्षात केलेल्या कार्यवाहीत सुमारे रुपये ५७ लाखांचा गुटखा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कर्नाटकातून औरंगाबादला गुटखा घेऊन येणाऱ्या एका जीपला अडवून पाचोड तालुका पैठण

येथे रुपये १२ लाख ५० हजारांचा गुटखा जप्त केला असल्याचे माहे **एप्रिल**, २०१५ दरम्यान निदर्शनास आले **आहे**, हे ही ी खरे आहे **काय**,

(४) तसेच जालना येथील जामवाडी व देवळगाव राजा रोडवरील गोदामावर बदनापूर पोलिसांनी दिनांक १७ **ऑगस्ट**, २०१५ रोजी वा त्यासुमारास टाकलेल्या धाडीत सुमारे दीड कोटीचा **गोवा**, बाबा सुगंधीत **तंबाखु**, **हिरा**, माणिकचंद गुटखा इत्यादी मुद्देमाल जप्त केला **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(५) **असल्यास**, गुटख्यावर बंदी असतानाही राज्यात सर्वत्र राजरोसपणे गुटख्याची विक्री करणाऱ्याविरुध्द बंदी घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत **आहे**,

(६) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) **होय**, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

तथापि, जप्त केलेल्या साठयाची किंमत सुमारे ८ लाख इतकी आहे.

(४) हे खरे आहे.

तथापि, जप्त केलेल्या साठयाची किंमत सुमारे १ कोटी ११ लाख इतकी आहे.

(५) राज्यात २० **जुलै**, २०१२ पासून **गुटखा**, पानमसाला इत्यादी तत्सम अन्न पदार्थांवर प्रतिबंध घालण्यात आला आहे.` सन २०१२ पासून ते **ऑक्टोबर**, २०१५ या कालावधीत अवैध मार्गाने प्रतिबंधित अन्न पदार्थांची व्रिक्री होत असलेल्या सुमारे रु. ६२ कोटी एवढया किंमतीचा **साठा**, अन्न व औषध प्रशासनाने जप्त केलेला आहे.

राज्यात गुटखा विक्रीस आळा बसण्यासाठी भा.द.वि. कलम २७२ व २७३ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे. तसेच गुटखा विक्री करणा-यांवर भा.द.वि.कलम ३२८ चा वापर करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

बडनेरा (जि. अमरावती) येथील स्वस्त धान्य दुकानावर धाड टाकून बनावट कारवाई केल्याबाबत

(२४) * u३७१११ uuडॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बडनेरा (जि.अमरावती) ी येथील स्वस्त धान्य दुकानावर छापे टाकून अंदाजे ७ लक्ष रुपयांचे धान्य जप्त केल्यावरही सबंध कार्यवाही बनावट असल्याची बाब निदर्शनास आली **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे **काय**, त्यानुसारर संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत **आहे**,

(३) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२) व (३) बडनेरा (जि.अमरावती) येथील स्वस्त धान्य दुकानावर छापे टाकून

अंदाजे ७ लक्ष रूपयांचे धान्य जप्त केल्यावरही संबंध कार्यवाही बनावट असल्याची बाब निदर्शनास आली **आहे**, हे खरे **नाही**,

तथापि, संबधित स्वस्त धान्य दुकानाच्या आकस्मिक तपासणी वेळी दुकानात अंदाजे रुपये ७ लक्ष इतक्या किंमतीचे जास्त प्रमाणातील अन्नधान्य आढळून **आल्याने**, स्वस्त धान्य दुकानदाराविरुध्द दिनांक **४/१२/२०१४** रोजी ई.सी.ॲक्टनुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यातत आलेला **असून**, दिनांक **१५/१२/२०१४** रोजी सदर दुकानाचे प्राधिकार पत्र रद्द करण्यात आले **होते**, त्याविरुध्द स्वस्त धान्य दुकानदाराने मा. मंत्री (अनापुवग्रासं) यांचेकडे पुनरिक्षण अर्ज सादर केला **असता**, मा. मंत्री महोदयांनी स्वस्त धान्य दुकानदारास रु **१०,०००**/- एवढा दंड आकारुन स्वस्त धान्य दुकानदाराचे प्राधिकार पत्र पुर्ववत सुरु करण्याचे आदेश पारित केले आहेत.

लोणी (ता.जि.अहमदनगर) येथील प्रवरा वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसचा प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली विद्यार्थीनीच्या पालकाची करण्यात आलेली फसवणूक

(२५) * ц३००८७ ццश्री.अमिन पटेल **(मुंबादेवी)**, श्री.अस्लम शेख (मालाड **पश्चिम)**, श्री.राहुल जगताप **(श्रीगोंदा)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणी (ता.जि.अहमदनगर) येथील प्रवरा वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या व्यवस्थापन कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली हैद्राबादच्या एका विद्यार्थीनीच्या पालकाला २५ लाखांला लुबाडल्याबाबत माहे **ऑगस्ट**, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, राज्यात वैदयकीय महाविद्यालयाचे नाव वापरून फसविणारे रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

नमुद प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन लोणी पोलीस ठाणे येथे **गु.र.नं.१४५/१५** भा.दं.वि.कलम **४२०, ४६५,४६३**, ४७० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) सदर गुन्ह्यातील आरोपीचे साथीदार यांचे बाबतची माहिती मिळविण्यासाठी इलेक्ट्रानिक्स माध्यमांचा तसेच सी.सी.टी.व्ही. फुटेजची मदत घेण्यास येवून दाखल गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करण्याकरीता व असे आरोपीचे रॅकेट सक्रीय आहे अगर कसे यासंबंधी तपास चालु आहे.

(३) प्राप्त तक्रारीवरुन उक्त नमुद गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्याचा सर्वांगीन मुद्दयावर सखोल तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

पालघर जिल्ह्यातील स.तू.कदम महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाल्याबाबत

(२६) * u२९५४८ uuश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील स.तू.कदम महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांना दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मध्यान्ह भोजनातून विषबाधा झाली असून उक्त विद्यार्थ्यांची प्रकृती अत्यंत गंभीर इ ाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१)१ व (२) दि.३ ऑगस्ट,२०१५ रोजी स.तू.कदम विद्यालय, पालघर या शाळेतील ४६१ विद्यार्थ्यांनी शालेय पोषण आहार खाल्ल्यानंतर त्यापैकी २६ विद्यार्थ्यांना उलटी व पोटदुखीचा त्रास झाला होता. सदर विद्यार्थ्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर दि.५/८/२०१५ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना ा रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सदर घटना घडल्यानंतर तात्काळ आहाराचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले नाहीत, तसेच घटनेबाबत सखोल चौकशी केली नाही इ.बाबीत कसूर केल्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, पालघर यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

मौजे वडणगे (जि.कोल्हापूर) येथील पाणी पुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(२७) * u३०५४६ uuश्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वडणगे (जि.कोल्हापूर) येथीलल राष्ट्रीय पेयजल पाणी पुरवठा योजना अपूर्णावस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजनेत गैरव्यवहार झाला असून शासकीय रकमेचा अपहार केल्याप्रकरणी ठेकेदार विजय भिर्के व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शहरप्रमुख, कोल्हापूर दक्षिण व शहरप्रमुख कोल्हापूर उत्तर यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांसह ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

योजनेतील उंच साठवण टाकी वगळता सर्व उपांगांची कामे पूर्ण झाली असून गावास फ़ेब्रुवारी २०१३ पासून पाणीपुरवठा सुरु आहे. उंच साठवण टाकीचे अपुर्ण काम जानेवारी २०१६ अखेरर पूर्ण करण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणी कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी ी युवक कौंग्रेसचे` सरचिटणीस श्री. सुनिल वसंतराव परीट यांच्या दि.२०.०७.२०१५ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर कामाची प्राथमिक चौकशी करणेत आली आहे. सदर योजनेच्या दाबनलिकेच्या ा मार्गात स्थानिक वादामुळे बदल झालेने` कमी झालेल्या ा लांबीची रक्कम मक्तेदाराच्या ा पुढील चालु देयकातून वसूल करण्यात येत आहे.

तसेच, याबाबत मागील देयकातून वेळीच वसुली न केलेबाबतत संबंधित उप अभियंता ा यांचा खुलासा ा मागविणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे` प्राथमिक चौकशीत काही बाबी अधिक स्पष्ट होत नसलेने अन्य उप अभियंत्यामार्फ़त फ़ेरचौकशी करणेचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

एमकेसीएलकडून मुंबई विद्यापीठाच्या प्रवेश नोंदणी, हॉलतिकिट, गुणपत्रिका वितरित करणे इ.कामात झालेल्या चुका

(२८) * **uउ३६४०८ uuश्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील प्रवेश नोंदणी, हॉलतिकिट, गुणपत्रिका वितरित करणे आदी कामे ही एमकेसीएलकडून करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) मात्र सदर एमकेसीएल कडून प्रवेश नोंदणी, हॉलतिकिट, गुणपत्रिका वितरित करणे इत्यादीमध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी व चुका आढळून आल्या असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एमकेसीएलची चौकशी करण्यात येणार आहे काय,

(४) तद्‌नुसार मुंबई विद्यापीठ प्रशासनाची उदासिन भूमिका आणि एमकेसीएल व महाविद्यालयाच्या हलगर्जीपणामुळे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान व मानसिक त्रास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) एमकेसीएल या अभिकरणाकडून विद्यापीठाच्या पदवीच्या मुख्य परीक्षांसाठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारणे व परीक्षांचे हॉल तिकीट देणे ही कामे करुन घेतली जातात.त गुणपत्रिका वितरित करण्याचे काम या अभिकरणाकडे नाही.

(२) हॉलतिकीट मध्ये त्रुटी व चुका आढळून आल्या. तथापि, गुणपत्रिका वितरीत करण्याचे काम MKCL या अभिकरणाकडे नाही.

(३) कुलगुरु महोदयांनी यासंदर्भात व्दिसदस्यीय समितीची नेमणूक केलेली असून चौकशी करण्यात येत आहे.

(४) व (५) सदर चौकशीचा अहवाल विद्यापीठाच्या परीक्षासंबंधी निर्णय घेण्यासाठी परीक्षा मंडळ या प्राधिकरणाकडे सादर करण्यात आला असून नियमानुसार योग्य ती कार्यवाही या प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे.

मुंबई-परळ येथील हाफकिन प्रशिक्षण व संशोधन संस्थेत सहाय्यक संचालक आणि वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदांच्या भरतीत झालेला गैरव्यवहार

(२९) * ३०५०२ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथीलल हाफकिन प्रशिक्षणण संशोधन आणि चाचणी संस्थेमध्ये` सहाय्यक संचालक आणि वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदासाठी दिनांक २६ मार्च ते १० एप्रिल दरम्यान घेण्यात आलेल्या पद भरतीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदांची भरती करताना सर्व शासकीय निर्णयाचे, नियमांचे उल्लंघन केल्याची आणि पदासाठी पात्र उमेदवारांना डावलून अपात्र उमेदवारांची निवड केल्याची तक्रार राज्याच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांकडे माहे जुलै २०१५५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे तसेच संचालक व अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी हाफकीनने मागविलेल्या अर्जदार उमेदवारांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्थेमध्ये सन २०१५ मध्ये झ ालेल्या भरती प्रक्रियेबाबतची तक्रार दि. २९/७/२०१५ अन्वये प्राप्त झाली आहे.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संचालक हाफकीन संस्था यांनी अहवाल सादर केला असून तो तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भ ावत नाही.

नाशिक जिल्ह्यातील वागदर्डी धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने मनमाड शहराला टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत

(३०) * ३०२२९ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मनमाड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वागदर्डी धरणातील पाणीसाठा संपुष्टात आल्याने तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे, पुढील पाण्याचे आवर्तन मिळण्याबाबत अनिश्चितता असल्याने जिल्ह्यातील तिसऱ्या क्रमांकाचे लाखभर लोकसंख्येच्या शहराला सध्या ा टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) **असल्यास**, सदर प्रस्तावाला मंजूरी देवून येथे टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत **आहे**,

(३) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१)१ व (२)२ होय.

जिल्हाधिकारी, नाशिक यांनी मान्यता दिल्यानुसार मनमाड शहरास **दि.२७.०८.२०१५** ते **दि.०७.०९.२०१५** पर्यंत ३० टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे **दि.०४.०९.२०१५** चे आदेशान्वये पालखेड धरण समूहातून ७०० द.ल.घ.फू.पाण्याचे आवर्तन सोडणेत आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सोनाळवाडी (ता.कर्जत, जि. अहमदनगर) ग्रामीण
पाणी पुरवठा योजनेत झालेला गैरव्यवहार

(३१) * u३००८२ uuश्री.विजय औटी **(पारनेर)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनाळवाडी **(ता.कर्जत**, जि.अहमदनगर) ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे काम ७ वर्षानंतरही पूर्ण झाले नसल्याचे दिनांक १५ **ऑगस्ट**, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, सदरहू योजनेचे काम पूर्णण झाल्याचे कागदोपत्री दाखवून देयके काढल्याची व सदरहू कामासाठी मंजूर असलेल्या रु. ५८ लाख निधीतील रक्कम ४९ लाख रुपये खर्च करुन **७०**% काम अपूर्ण असल्याची माहिती निदर्शनास आली **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, याबाबत शासनाने चौकशी केली आहे **काय**, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवरर कोणती कारवाई केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१)१अंशत: खरे आहे.

सदर योजनेतील बनसोडे वस्ती व शेरेवस्ती वगळता अन्य १० वस्त्यांना माहे डिसेंबर २०११ मध्ये पाणी पुरवठा सुरु करण्यात आला होता. **तथापि**, योजनेच्या उद्‌भवास उन्हाळ्यात पाणी कमी **झाल्याने**, तसेच **जून**, २०१५ मध्ये योजनेच्या साहीत्याची चोरी झाल्याने पाणी पुरवठा बंद झाला होता.

(२)२ हे खरे नाही.
(३)३ प्रश्न उद्‌भवत नाही.
(४)४ प्रश्न उद्‌भवत नाही.

आयसीएसई बोर्डाच्या दहावीच्या इतिहास पाठ्यपुस्तकात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा इतिहास समाविष्ट

करण्याबाबत

(३२) * ५३०२८० ««प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयसीएसई (भारतीय प्रमाणपत्र माध्यमिक शिक्षण) या खाजगी बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या एकूण इतिहास आणि नागरीकशास्त्र या पाठ्यपुस्तकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भातील इतिहास नावाचाही उल्लेख करण्यात आला नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, आयसीएसई या मंडळावर शासनाचे, कोणतेही नियंत्रण नसल्याने सदरहू पाठ्यपुस्तके तात्काळ मागे घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा इतिहास नमूद असलेले नवीन पुस्तक प्रकाशित करण्याची मागणी त्यांच्या अनुयायांमार्फत करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२), (३) सदर बाब आयसीएसई बोर्डाच्या पाठ्यपुस्तकाच्या संदर्भात असून या संदर्भातत आयसीएसई मंडळास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

शास्त्रीनगर नागपूर येथे पारले कंपनीच्या मुदतबाह्य
बिस्किटांचा साठा जप्त केल्याबाबत

(३३) * ५२९३८५ ««श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शास्त्रीनगर येथे पारले कंपनीचे उत्पादीत केलेले नमकीन, बिस्किट, वेफर्स, इत्यादी मुदतबाह्य अन्नपदार्थांचा साठा विक्रीसाठी नेत असलेले चार ट्रकक अन्न व प्रशासनाने जप्त करण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारले कंपनीचे मालक श्री.योगेश ग्वालानी मुदतबाह्य असलेल्या पाकीटावरील उत्पादन तिथी थिनर या रसायनाच्या सहाय्याने पुसून पुनर्विक्रीकरीता पुनर्मुद्रित करण्याची माहिती मिळाली असता शासनाने कारवाई केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) तसेच अन्न व औषधी प्रशासन विभागाने सदर कंपनी सील करून टाळे ठोकले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे` काय, त्यानुषंगाने श्री.योगेश ग्वालानी यांना मदत करणाऱ्या अन्न व प्रशासन विभागाच्या कर्मचांऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच राज्यात अशा प्रकारे होत असलेल्या मुदतबाह्य अन्नपदार्थांची विक्री रोखण्यासाठी ीकोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) होय, हे खरे आहे.

तथापि, नागपूर येथील शास्त्रीनगर पारले कंपनीचे उत्पादित केलेले नमकीन, बिस्किट, वेफर्स, इत्यादी मुदतबाहय अन्नपदार्थाचा साठा विक्रीसाठी चार ट्रक मधून नेला नसून, तो विक्रीसाठी घरी साठविलेला होता.सदरचा मुदतबाहय झालेला अन्नपदार्थ अन्न व औषध प्रशासनाच्या नागपूर विभागाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये सुमारे १२ लाख रुपये किंमतीचा सहा टन साठा जप्त करुन नष्ट केला आहे. श्री.योगेश ग्वालानी हे मे. राजा एजन्सीचे मालक असून, त्यांचे विरुध्द पोलिस स्टेशन नंदनवन, नागपूर येथे गुन्हा क्र. ३३५/२०१५ दि. २६/८/२०१५ रोजी दाखल केला आहे.

(३), (४) व (५) uसदर प्रकरणी आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांना चौकशी करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

देसाईगंज (जि.गडचिरोली) येथे कमी दर्जाचे खाद्य तेल उच्च दर्जाचे पॅकेट वापरुन वितरीत करणाऱ्या व्यापाऱ्याला केलेली अटक

(३४) * u३२५३० uuश्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज येथे कमी दर्जाचे खाद्य तेल उच्च दर्जाचे पॅकेट वापरुन वितरीत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यापाऱ्याला अन्न व औषधी प्रशासन विभागाने अटक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात खाद्य तेलात मोठ्या प्रमाणात भेसळ करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने खाद्य पदार्थात भेसळ करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

संत गाडगेबाबा व अमरावती विद्यापीठांशी संलग्न असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अपुऱ्या प्राध्यापक वर्गामुळे परिक्षा मुल्यांकनास होत असलेला विलंब

(३५) * u३५८०६ uuश्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा विद्यापीठ व अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये असलेल्या ा अपुऱ्या प्राध्यापक वर्गामुळे परिक्षा मुल्यांकनास विलंब झाल्याने सन २०१५ च्या हिवाळी सत्रातील परिक्षा पुढे ढकलण्याची वेळ विद्यापीठावर **आली**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, उक्त विद्यापीठांतर्गत एकूण २८ अभियांत्रिकी महाविद्यालये असून प्राध्यापकांची १८५४ पदे मंजुर असतांनाही प्रत्यक्षात ६५५ प्राध्यापक असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम झाला **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, सदर प्रकरणी प्राध्यापकांचा अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय. दिनांक ०५/११/२०१५ पासून सुरु होणाऱ्या अभियांत्रिकी व तांत्रिक विद्याशाखेच्या परीक्षा दिनांक १६/११/२०१५ पासून सुरु करण्यात आल्या आहेत.

(२) खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये संबंधित विद्यापीठाच्या मान्यतेने शिक्षकीय पदे भरण्यात येतात. तसेच सदर संस्था रिक्त असलेल्या शिक्षकीय पदावर कंत्राटी/हंगामी तत्वावर अध्यापकांची नियुक्ती करतात.

(३) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना रिक्त शिक्षकीय पदे भरण्याबाबत विद्यापीठामार्फत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धान्याचा लिलाव झाला नसल्याबाबत

(३६) * u३०८८६ uuश्री.कालीदास कोळंबकर **(वडाळा)**, श्री.अमिन पटेल **(मुंबादेवी)**, श्री.नितेश राणे **(कणकवली)**, श्री.नसीम खान **(चांदिवली)**, श्री.अब्दुल सत्तार **(सिल्लोड)** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या तब्बल २५ हजार क्विंटल धान्याचा लिलाव दोन वर्षे झाला नसल्याने सदर जिल्ह्यातील १६ गोदामात नवे धान्य ठेवण्यासाठी जागाच शिल्लक राहिली नसल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये` वा त्या दरम्यान निदर्शनास आले **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, शेतीच्या प्रत्येक हंगामात माहे ऑक्टोबरपासून मार्च-एप्रिलपर्यंत धान खरेदी होते आणि त्यानंतर त्याचा लिलाव फेडरेशनमार्फत केला जातो ही प्रक्रिया दरवर्षी केली जाते परंतू या प्रक्रियेला या वर्षी खंड पडल्याने सन **२०१३-१४** ला खरेदी केलेल्या ा धान्याचे लिलाव तब्बल एक वर्ष पुढे ढकूलन ते नुकतेच माहे जुलै महिन्यात घेण्यात आले हे लिलाव होईपर्यंत मागील वर्षाचे धान्य गोदामात पडून राहिल्याने जागा नसल्याचे कारणे पुढे करुन सन २०१४-१५ या सरत्या हंगामातील धान्याची खरेदीच मार्केटिंग फेडरेशनने केली नसल्याने`जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हजारो क्विंटल धान्य वाया गेले असून त्यांचे आर्थिक नुकसान झाले **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे **काय**, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) अंशत: खरे आहे.
रत्नागिरी जिल्हयात २४,४९८.४६ इतके क्विंटल धान मार्केटिंग फेडरेशन यांचेमार्फत खरेदी करण्यात आले होते. **तथापि**, सदर धान हे लिलाव प्रक्रिया न झाल्याने` प्रलंबित नसून भरडाई न झाल्यामुळे शिल्लक होते. त्यामुळे ही बाब ऑगस्ट २०१५ मध्ये निदर्शनास येण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) अंशत: खरे आहे.

धान मार्केटिंग फेडरेशन यांचेमार्फत खरेदी करण्यात येते. परंतू लिलाव त्यांचेमार्फत करण्यात येतो हे खरे नाही. धान भरडाईविना शिल्लक राहिल्यामुळे राज्य शासनाने दिनांक १६ मार्च २०१५ रोजीच्या निर्णयाने सदर धानाचा लिलाव करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे लिलाव प्रक्रिया त्यांनतर सुरु करण्यात आली. मागील वर्षाचे धान शिल्लक होते हे खरे आहे. **तथापि**, सन **२०१४-१५** या सरत्या हंगामातील धान वाया गेल्याबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत **नाही**, **तथापि**, शिल्लक धानाचा लिलाव करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगेसह सर्व नद्यातील प्रदूषणाबाबत

(३७) * ५२९०८६ ५५**श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी)** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगेसह सर्वच नद्यातील प्रदूषणामुळे मत्स्यजीवन धोक्यात आले असूननसदर प्रदूषण थांबविण्यामध्ये अपयश आले **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, पंचगंगा प्रदूषण मुक्तीसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळाला नसल्याने जिल्हापरिषदेने नाबार्ड आणि राज्य शासनाकडे निधीची मागणी केली **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयास राष्ट्रीय नदी कृती योजने अंतर्गत सदर प्रस्ताव पाठविला असता ग्रामीण भागातील योजना निकषात बसत नसल्याने निधी मंजूर करता येणार नसल्याबाबत कळविल्याने यासाठी निधीचा प्रस्ताव शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर करण्याबाबत जिल्हा **परिषद**, कोल्हापूर यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील १५ गावांसाठी असलेली पाणीपुरवठा योजना बंद असल्याबाबत

(३८) * u३४४७७ uuश्री.राहुल जगताप **(श्रीगोंदा)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील १५ गावांसाठी असलेली पाणीपुरवठा योजना माहे ऑगस्ट, २०१५ पासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर योजना सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) घोसपुरी व इतर १७ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना विसापूर, ता. श्रीगोंदा येथील जलाशयावरून घेतलेली आहे. दि. ३.८.२०१५ पासून जलाशयात पाणी नसल्याने योजना तात्पुरती बंद झाली होती. तथापि, दिनांक २५.८.२०१५ रोजी कुकडी प्रकल्पातून विसापूर जलाशयात पाणी सोडण्यात आल्याने योजना दिनांक २५.८.२०१५ पासून पूर्ववत सुरू होऊन योजनेतील पाण्याची मागणी असलेल्या गावांना पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

निळोणा धरण (जि. यवतमाळ) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जमिनीवर अवैध रित्या वृक्षतोड करुन शेतीकरीता अतिक्रमण होत असल्याबाबत

(३९) * u३५७९७ uuश्री.मदन येरावार **(यवतमाळ)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील निळोणा धरण येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जमिनीवर अवैध रित्या वृक्षतोड करुन शेतीकरीता अतिक्रमण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत श्री. मोहनसिंग रामसिंग पवार, सरपंच ग्राम पंचायत बरबडा (चैधरा) ता.जि.यवतमाळ यांनी जिल्हाधिका-याकडे दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारासस ग्राम सभेच्या ठरावासहीत निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबततमहाराष्ट्ररजीवन प्राधिकरण कार्यालय, यवतमाळ यांच्याकडून वडगांव पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) अधिग्रहीत जमिनीचे सीमाकंन करुन अतिक्रमित जागेची निश्चिती करुन पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४०) * ७३२९५२ ७७डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चालू शैक्षणिक वर्षात १४ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राध्यापकांची ५२ पदे तर सहयोगी प्राध्यापकांची २०३ आणि सहाय्यक प्राध्यापकांची ४११ पदे अद्याप भरण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर आणि गडचिरोली तसेच बोरीवली येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे`ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध नसणे, रुग्णांची होत असलेली परवड, तसेचच बहुतेक महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात निधीची गरज असताना नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यामागील कारणे काय आहेत,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्राध्यापकांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय. हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) जागतिक आरोग्य संस्थेच्या मानकानुसार (WHO) लोकसंख्येच्या तुलनेत **१:१०००** याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होण्याचे उद्दीष्ट / ध्येय साधणे शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा निर्णय प्राथमिक अवस्थेत असून अंतिम करण्यात आलेला नाही.

(४) शासकीय वैद्यकीयय महाविद्यालयातील अध्यापकांची रिक्त पदे सरळसेवेद्वारे व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

अमरावती येथील प्राथमिक शिक्षण विभागात शासन निर्णयाविरोधात
पदाचा गैरवापर करुन पदभरती केल्याबाबत

(४१) * u३३२७४ uu**श्री.आकाश फुंडकर (खामगांव)** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील प्राथमिक शिक्षण विभागातील उपसंचालक श्री पवार, श्रीमती वैशाली ठग (जाधव), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), श्री आंधळे, उप शिक्षणाधिकारी, कक्ष अधिकारी श्री वराडे, वरिष्ठ सहायक, श्री थोंबाडे यांनी पदाचा गैरवापर करून शासन निर्णयाविरोधात आदेश देवून अनियमितता व गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेची सन २०११-१२ ची संच मान्यता दिनांक ३० एप्रिल, २०१२ रोजी शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या कार्यालयाने निर्गमित केली असून त्यामध्ये १ पद अतिरिक्त असल्याचे` दाखविले` असतानाही तसेच शिक्षण सेवकाचा ३ वर्षाचा कालावधी दिनांक २५ ऑगस्ट, २०१२ रोजी पूर्णण असूनही त्या शिक्षण सेवकाला सहायक शिक्षण पदासाठी पात्र ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केवळ शिस्तभंगाची कारवाई न करता या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय

(२) व (३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी आयुक्त शिक्षण यांच्याकडून दि.१८.२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

शिरसंगी व उचंगी (जि.कोल्हापूर) येथील शाळेच्या
धोकादायक असलेल्या इमारतीबाबत

(४२) * u३२५५६ uu**श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड)** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरसंगी (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील केंद्र, प्राथमिक शाळेची इमारत धोकादायक असून सदरहू इमारतीत विद्यार्थ्यांच्या जिविताला धोका आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उचंगी (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची धोकादायक इमारत माहे सप्टेंबर, २०१५ च्या चौथ्या सप्ताहात कोसळल्याने विद्यार्थ्यांना किचन शेडमध्ये शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर इमारतींची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही. ी सदर प्राथमिक शाळेच्या इमारतीमधील ३ शाळा खोल्यांचे निर्लेखन करण्यात आले आहे.

(२) प्राथमिक शाळेच्या दोन वर्गखोल्यांपैकी एक वर्गखोली कोसळली असून दुसरी वर्गखोली सुस्थितीत आहे. कोसळलेल्या वर्गखोलीमध्ये अध्ययन घेत असलेल्या विद्यार्थ्यासाठी खाजगी खोली भाडयाने घेतली असून तेथे वर्ग भरविला जात आहे.

(३) वि.मं.शिरसंगी ता.आजरा या शाळेचे निर्लेखन करण्यात आले आहे. तसेच, वि.मं.उच्चंगी या शाळेचे निर्लेखन करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

वाशिम जिल्ह्यातील राजूरा व जऊळका रेल्वे तसेच उडी वारदरी येथील पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

(४३) * u२९७२५ uuश्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील राजूरा जिल्हा परिषद सर्कल म्हणून ओळखल्या जाणारा राजूरा गावातील पाणीपुरवठा योजना बंद अवस्थेत असल्यामुळे पाण्यासाठी नागरीकांना पायपीट करावी लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्ह्यातील जऊळका रेल्वे येथील ग्रामस्थांसह उडी वरदरीच्या ग्रामस्थांची १७ वर्षापूर्वी केलेली तीन गाव पाणी पुरवठा योजना अद्याप कार्यान्वित झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही ीखरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर तीन गावची प्रादेशीक योजनेची कामे एप्रिल, २००९ मध्ये पुर्ण होऊन योजना ा दि. ०१.०५.२००९ पासुन कार्यान्वीत करण्यात आली आहे. योजनेचा पुढील पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्ती करिता सदर योजना जिल्हा परिषद, वाशिम यांनी ताब्यात घेतली नाही. सदर योजना चालविण्याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे निधी नाही. त्यामुळे पाणी टंचाई अंतर्गत निधी मिळाल्यानंतर योजना उन्हाळ्यामध्ये सुरु असते. सन २०१५ मध्ये सुध्दा मार्च ते जुलै पर्यंत पाणी टंचाई निधीतुन ३ गावास पाणी पुरवठा देण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

परभणी जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानातून गव्हाचा होत असलेला काळाबाजार

(४४) * u२९३४५ uuश्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख

(मालेगांव **मध्य**), अॅड.के. पाडवी **(अक्कलकुवा)**, डॉ.संतोष टारफे **(कळमनुरी)**, श्री.अमिन पटेल **(मुंबादेवी)**, श्री.नसीम खान **(चांदिवली)**, अॅड.यशोमती ठाकूर **(तिवसा)**, श्रीमती निर्मला गावित **(इगतपूरी)**, प्रा.वर्षा गायकवाड **(धारावी)** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानातून गोरगरीबांसाठी वाटप करण्यासाठी येत असलेल्या रेशनच्या गव्हाचा ा काळया बाजारात विक्री करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे गरीब व गरजू नागरिकांना स्वस्त धान्य दुकानांत कधीच धान्य मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये` वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने` गव्हाची काळयाबाजारात होत असलेली विक्री त्वरीत थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर धान्याची विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२), (३), व (४)४ प्रश्न उद्‌भ ावत नाही.

पुणे शहरातील नदी सुधार योजनेचा सविस्तर प्रकल्प आराखडा करण्यासाठी मास्टर प्लॅन तयार करण्याबाबत

(४५) * ध३२७७९ धधश्री.दिलीप वळसे-पाटील **(आंबेगाव)**, श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा **कळवा)** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील नदी सुधार योजनेचा सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) करण्यासाठी मास्टर प्लॅन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदी सुधार योजनेअंतर्गत सविस्तर प्रकल्प आराखड्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, नदी सुधारणा योजनेसाठी कोणकोणत्या क्षेत्रातील तज्ञाची ी समिती नेमण्यात आली आहे,

(४) असल्यास, या नदी सुधारणा योजनेसाठी केंद्र शासनाकडून किती रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे ?

श्री. रामदास कदम : (१)१ हे खरे आहे.

पुणे शहरातील मुळा-मुठा नदीवरील जल प्रदुषण निर्मुलनाकरिता राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) दिनांक २१ मे, २०१२ रोजी केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविला आहे.

(२) सदर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार नदी सुधार विकासात्मक आराखड्याच्या प्रकल्पाची ी किंमत रू.११८१ कोटी ी इतकी आहे.

(३) एनआरसीडीकडील तज्ञ सल्लागार मे. व्यापकॉस लि. नवी दिल्ली ी यांनी सदर योजनेची तांत्रिक छाननी पूर्ण केली आहे.

(४) केंद्र शासनाची अंतिम मंजूरी प्रलंबित आहे.

राज्यात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना रोख रक्कम व पारितोषिक देण्याबाबत

(४६) * u३४५१८ uuश्री.योगेश सागर **(चारकोप)** : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ी दिनांक ३० जानेवारी ते` दिनांक १४४ **फेब्रुवारी**, २०१५५ च्या दरम्यान झ ाालेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये एकूण ३० **सुवर्ण**, ४३ रौप्य व ५० कांस्य पदके **जिंकली**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, महाराष्ट्र ऑलिंम्पिक संघटनेने **मा.मुख्यमंत्री**, मा.क्रीडा मंत्री व राज्याच्या क्रीडा विभागाकडे पारितोषिक व रोख रक्कम मिळण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २४ **फेब्रुवारी**, २०१५ रोजी पाठविला असल्याचे दिनांक ९ **ऑगस्ट**, २०१५५रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, यापूर्वीही सन २००९९तसेच सन २०११ या क्रीडा स्पर्धामध्येही पदक विजेत्या खेळाडूंना शासनाने रोख रक्कमेचे पुरस्कार दिले **आहेत**, हे ही खरे आहे **काय**,

(४) **असल्यास**, दिनांकक ३०० जानेवारी ते दिनांक १४४ **फेब्रुवारी**, २०१५५ दरम्यानच्या पदक विजेत्या खेळाडूंना शासन रोख रक्कमेचे पुरस्कार देवून त्यांना प्रोत्साहन देणार **आहे**, **हे** खरे आहे **काय**,

(५) **असल्यास**, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(६) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) नाही. याबाबतचा प्रस्ताव शासनास मार्च २०१५ मध्ये प्राप्त झाला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५)५दिनांक ३० जानेवारी ते दिनांक १४ **फेब्रुवारी**, २०१५ दरम्यान झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमधील पदक विजेत्या खेळाडूंना रोख पुरस्कार देण्यासाठी निधी उपलब्ध करूनन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भ ावत नाही.

राज्य शासनाने मराठी भाषेचे धोरण ठरविण्यासाठी मराठी भाषा सल्लागार समिती नेमल्याबाबत

(४७) * u२९१४३ uuश्री.अतुल भातखळकर (कांदिवली **पूर्व)** : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पुढील २५ वर्षासाठी मराठी भाषेचे धोरण ठरविण्यासाठी मराठी भाषा सल्लागार समिती नेमली **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, सदर समितीने बॉम्बे हायकोर्टाचे नामकरण महाराष्ट्र आणि गोवा उच्च न्यायालय असे

करण्याबाबतची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सरकारी कार्यालये, न्यायव्यवस्था, वित्तसंस्था, बँका, उद्योग या क्षेत्रात मराठीचा अपेक्षित वापर होत नसल्याबद्दल समितीने खेद व्यक्त केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन याबाबत कायदा व मार्गदर्शिका तयार करण्याबाबत तसेच बॉम्बे हायकोर्टाचे नामकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) शासन व्यवहारात मराठीचा प्रभावी वापर करण्याकरीता विभागांतर्गत घभाषा सल्लागार समितीङ ही कायमस्वरुपी समिती गठित करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या पुढील २५ वर्षाचे धोरण निश्चित करण्याकरीता सदर समितीअंतर्गत उपसमिती गठित केली असून या उपसमितीमार्फत धोरणाचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) भाषा धोरणाचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही समितीमार्फत सुरु आहे. अंतिम मसूदा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर शासनस्तरावर विचार विनिमय करुन विहित कार्यपध्दतीने धोरण निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

बॉम्बे हायकोर्टाचे नामकरण बदलण्याबाबतचा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असून विधी व न्याय विभागाकडून केंद्र शासनाकडे पाठपूरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

माणगाव (जि.रायगड) येथील तालुका क्रीडा संकुलनाच्या दयनीय अवस्थेबाबत

(४८) * ц३५५९९ цц**श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर)** : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (ता.माणगाव, जि.रायगड) येथे दोन वर्षापूर्वी उदघाटन झालेल्या तालुका क्रीडासंकुलाची दयनीय अवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका क्रीडासंकुलनाचे गत अनेक महिन्यांचे थकीत असलेले वीज देयक एकदाच वितरण कंपनीने दिल्याने व अद्याप पर्यंत देयक न भरल्यामुळे क्रीडासंकुलाची वीज खंडित करण्यात आली असूनन तसेच नादुरुस्त असलेले शौचालय, बाथरूम, फुटलेले पाईप व तुटलेल्या विजेच्या तारा अशा अनेक गोष्टीमुळे क्रीडा प्रेमींची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त क्रीडा संकुलनाच्या दयनीय अवस्थेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२)२ अंशतः खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या दोषी अधिकारी/ कर्मचा-यांची चौकशी करण्याचे तसेच सदर क्रीडा संकुल सुस्थितीत आणून त्याचा वापर सर्वसामान्य जनता व खेळाडूंना होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पुढील उपाययोजना तातडीने करण्याच्या निर्देश देण्यात आले आहेत.

भायखळा (मुंबई) येथील जे.जे. रुग्णालय प्रशासनाने बेकायदा बांधकामाना परवानगी दिल्याबाबत

(४९) * ५३३६२२ ५५श्री.सुनिल प्रभू **(दिंडोशी)** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील जे.जे. रुग्णालयाच्या, एमबीबीएस विद्यार्थ्यांचे वसतीगृह, धोबीघाट येथील जे.जे.स्टाफ क्वॉटर्ससाठी आरक्षित असलेल्या दुभाष चाळीची जागेत तसेच स्कीन डिपार्टमेंट इमारतीलगत असलेल्या कचरा डंपिंगच्या शासनाच्या जागेत आरक्षण प्रक्रिया राबवून, आरक्षण न उठविता सदरहू प्रकल्पास रुग्णालय प्रशासनाने बेकायदा परवानगी दिल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने उच्चस्तरावरुन चौकशी केली आहे काय, तद्नुसार उक्त प्रकल्पाची त्वरीत मान्यता रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

चंद्रपूर येथील अंबुजा सिमेंट प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या विषारी वायुमुळे होत असलेले प्रदूषण

(५०) * ५३८३९१ ५५श्री.संतोष दानवे **(भोकरदन)** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील अंबुजा सिमेंट प्रकल्पात मोठयाप्रमाणावर विषारी कचरा जाळत असल्याने निर्माण होणाऱ्या विषारी वायुमुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन अंबुजा प्रकल्पाच्या व्यवस्थापनावार गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याचे आदेश केंद्रीय खते व रसायन राज्यमंत्री यांनी केंद्रीय समितीच्या भेटी दरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) आरोग्यावर गंभीर परिणाम झाला हे खरे नाही. तथापि, सदर उद्योगात प्लॅस्टीक कचरा जाळला जात होता हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मा. केंद्रीय खते व रसायन राज्यमंत्री यांनी म.प्र.नि. मंडळास दि. ०३/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित उद्योगाची चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

(३) होय व त्यानुसार मा.केंद्रीय खते व रसायन राज्यमंत्री यांना दिनांक २/१२/२०१५ च्या पत्रांन्वये अहवाल सादर करण्यात आला आहे.

(४) सदर उद्योग मॅगी नुडल्स प्लॅस्टिक पॉऊच सहित जाळत असल्याचे आढळ्यामुळे व त्यास परवानगी नसल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमत्तीपत्र मुल्यांकन समितीच्या दिनांक २३/११/२०१५ च्या बैठकीत कार्यवाही करुन सदर उद्योगाची रु. ५.०० लक्ष रुपयाची बॅक हमी जप्त करुनन अतिरिक्त रु.१० लाख बैंक हमी जमा करण्याचे आदेश देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

(५) प्रश्न उद्भ ावत नाही.

राज्यात चीन मधून प्लास्टिकचा तांदूळ येत असल्याबाबत

(५१) * u३००१७ uu**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व)** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चीन मधून प्लास्टिकचा तांदूळ येत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) नाही.

(२), (३) व (४) लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत प्लास्टिकचा तांदूळ प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच प्लास्टिकचा तांदूळ मिश्रित तांदुळ देखील प्राप्त झाल्याच्या तक्रारी राज्यात प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भ ावत नाही.

मुंबई विद्यापीठांतर्गत उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकनाच्या निकालात होत असलेली दिरंगाई

(५२) * u३०९४४ uu**ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम)** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्वच परिक्षांच्या उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकनाकरिता अर्ज करण्यापूर्वी उत्तरपत्रिकेची फोटोकॉपी मिळवावी लागते यासाठी रुपये ६०० वव पुनर्मूल्यांकनासाठी रुपये ५००

खर्च येत असल्यामुळे गेल्या ५ वर्षात विद्यापीठाला ५.५५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्मूल्यांकनाचे निकाल कधी एक महिना तर कधी वर्ष उलटून गेले तरी विद्यार्थ्यांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे पुनर्मूल्यांकनाचा निकाल वेळेत न लागणे व यासाठी लागणारे शुल्क अधिक असल्याने ते कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रस्तुत विद्यापीठांच्या अध्यादेशांनुसार शुल्क आकारले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील विशेष शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत व प्रलंबित वेतन तात्काळ अदा करण्याबाबत

(५३) * **uu३५०८५ uuश्री.सुरेश धानोरकर (वरोरा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुकबधीर, गतिमंद, मतिमंद, स्वमग्न विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता सन २००९ पासून शासनाने अपंग समावेशित शिक्षण योजना सुरू करून सदर योजनेवर कार्यरत असलेल्या विशेष शिक्षकांना दिनांक १५ सप्टेंबर, २०१० च्या शासन निर्णयान्वये राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत रिक्त पदी सामान्य शिक्षक म्हणून सामावून घेतले व नव्याने सन २००९ पासून माध्यमिक स्तरावरील अपंग मुलांसाठी तीच योजना I अपंग समावेशित शिक्षण योजना या नावाने सुरू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत आतापर्यंत १३६० विशेष शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय, असल्यास, हे सर्व विशेष शिक्षक मागील ४ ते ५ वर्षापासुन वेतनापासून वंचित असून मानसिक त्रास व आर्थिक टंचाईमुळे काही शिक्षकांनी आत्महत्या केल्या आहेत,

(३) असे असतांनाच शासनाने दिनांक ७ जुलै, २०१५ रोजीच्या शासन पत्रानुसार विशेष शिक्षकांच्या युनिट मान्यता व वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) या प्रकरणी नागपुर विभागाच्या जनप्रतिनिधी राज्याच्या मा. शिक्षण मंत्र्यांशी चर्चा केली असता या चर्चेदरम्यान विशेष शिक्षकांचे समायोजन लवकरच करण्यात येईल व त्यांचा वेतनाचा प्रश्नही सोडविण्याचे आदेश देण्यात आले असे आश्वासन नागपुर विभागाच्या जनप्रतिनिधींना देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे

(२) हे खरे नाही. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाने वेतन अनुदानास पात्र ठरविलेल्या २८९ विशेष शिक्षकांचे वेतन अदा करण्यात आले आहे.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्‌यालय, नागपूर येथील राजीव गांधी जीवनदायी योजनेची देयके विभाग प्रमुखाने प्रमाणित न केल्यामुळे प्रलंबित असल्याबाबत

(५४) * ३६३४८ **डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्‌यालय, नागपूर येथील विभाग प्रमुखामुळे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना गत १५ दिवसापासून बंद पडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभाग प्रमुख देयके प्रमाणित करीत नसल्याने औषध पुरवठादार संस्थेची कोटयवधीची देयके प्रलंबीत पडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमानुसार दरपत्रकावर (आरसी) औषधे विकत घेण्याचा नियम असतानाही उक्त संस्था १० टक्क्यांनी महाग असलेली औषधे विकत घेत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दिरंगाई करणा-या अधिका-यांवर अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) नागपूर यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नांदरुख (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) जलस्वराज्य प्रकल्पासंदर्भात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(५५) * ३८५७३ **ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : तारांकित प्रश्न क्रमांक २६७४६ ला दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरुख (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) जलस्वराज्य प्रकल्पातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता

समितीच्या विरोधात पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आल्याने समितीला तातडीने बरखास्त करण्यात येईल आणि या प्रकल्पात काही काळ सचिव पदी असलेले ग्रामसेवक, तांत्रिक सेवा पुरवठादार व जलस्वराज्य प्रकल्प कक्षातील मार्गदर्शन करणा-या संबंधित अधिका-यांवर देखील तातडीने कारवाई करण्यात येईल, असे मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून आजतागायत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे आणि सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात अक्षम्य दिरंगाई करणा-या संबंधित अधिकारी/कर्मचा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१)१ होय, हे खरे आहे.

(२) व (३) कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

बीड जिल्हापरिषदेच्या शाळेतील वेतन गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेली समिती

(५६) * u३३२१८ uu**श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर)** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हापरिषदेच्या शाळेतील ८०० पेक्षा अधिक शिक्षक वेतनाविना असून माहे मे, २०१४ पासून शालार्थ ऑनलाईन प्रणालीद्वारे वेतन अदा केले जात असून अतिरिक्त ठरलेल्या काही शिक्षकांनी दलालांना हाताशी धरुन शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापकाचा ा डीडीओ कोड वापरुन, पदस्थापना, संचमान्यता नसताना बेकायदेशीरपणे वेतन उचलले` असल्याने` वेतन घोटाळ्याच्या चौकशीसाठी ११ लेखाधिकारी नेमले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील लेखाधिकाऱी १५ दिवसात अहवाल सादर करणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, तद्नुसार अहवालात काय निष्पन्न झाले व संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे

(२) होय.

(३) व (४)४ अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. ी अहवाल प्राप्त झाल्यावर दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

देशातील ९ नामांकित विद्यापिठांच्या पदव्या आणि मार्कशिट देणाऱ्या सक्सेस अॅशुअर इन्स्टीट्युटच्या संचालकाला अटक केल्याबाबत

(५७) * ४३३९२९ ४४**श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील ९ नामांकित विद्यापिठांच्या पदव्या आणि मार्कशिट देणाऱ्या सक्सेस अॅशुअर इन्स्टीट्युटच्या संचालकाला पोलिसांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेमार्फत खाजगी संस्थेत पदवी प्रमाणपत्रे द्यायचे असल्यास त्या लोकांना प्रवेश देण्यात येत होता, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संस्थेच्या संचालकांनी हजारो लोकांना बोगस प्रमाणपत्रे व मार्कशिट दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) हे खरे नाही.

सदर संस्थेमार्फत ऑनलाईन माहिती नागरिकांना पाठवून त्या आधारे नागरिकांशी संपर्क साधून त्यांना कार्यालयात बोलून घेऊन त्यांच्याकडून निरनिराळ्या पदव्यांसाठी लोकांकडून रकमा घेतल्या आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी तपासामध्ये सत्तर नागरिकांकडून रकमा स्विकारल्याचे निष्पन्न झाले आहे.` याबाबत लष्कर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १३४/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.` तपासामध्ये निरनिराळ्या विद्यापीठांचे बनावट प्रमाणपत्र व मार्कशीट सापडले आहेत.त या गुन्ह्यामध्ये एकूण चार आरोपी असून त्यामधील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात आली असून उर्वरीत दोन आरोपींनी अटकपुर्व जामिन मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अर्ज दाखल केला असून सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बसर्गे (ता.गडलिंग्लज, जि. कोल्हापूर) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत नरेवाडी लघु पाटबंधाऱ्याजवळील जलशुध्दीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

(५८) * ४३४२०७ ४४**डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसर्गे (ता.गडलिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत नरेवाडी लघु

पाटबंधाऱ्याजवळ बांधण्यात येत असलेल्या जलशुध्दीकरणाच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय

ग्रामपंचायत बसर्गे, ता. गडहिंग्लज येथील चार ग्रामपंचायत सदस्यांनी नळ पाणीपुरवठा योजनेच्या जॅकवेलला गाळणचर (ट्रेंचगॅलरी) बांधणेच्या कामाबाबत लेखी तक्रार केली आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने उप अभियंता हे मौजे बसर्गे येथे चौकशीकरिता गेले होते. परंतु, दि.२८.०९.२०१५ ते दि.२४.११.२०१५ या कालावधीत मौ. बसर्गे ग्राम पंचायतीची निवडणुक आचारसंहिता असलेने सदर चौकशीची कार्यवाही पूर्ण करता आली नाही. सरपंच निवड दि.२४.११.२०१५ रोजी झाली असून पुढील चौकशीची कार्यवाही त्वरित पुर्ण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

नाशिक येथील वेलनेस फॉरएव्हरच्या औषधाच्या दुकानात
औषधांची प्रिस्क्रीप्शन शिवाय होत असलेली विक्री

(५९) * u३२१०४ uu**श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मधील फार्मासिस्ट श्री.नितीन औटी यांनी एफडीएकडे दिनांक २ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास केलेल्या लेखी तक्रारीनुसार एफडीएच्या औषध निरीक्षकांनी दिनांक ८ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारासस नाशिक मधील कॉलेज रोड येथीलल वेलनेस फॉरएव्हर औषधाच्या दुकानात धाड घालून तपासणी केली असता शेड्युल एच-१ मधील तसेच अन्य औषधांची प्रिस्क्रीप्शन शिवाय विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्यंत भामरे सहआयुक्त, अन्न, नाशिक एफडीए यांनी सदर दुकानाच्या केलेल्या तपासणीत नियमबाहय गोष्टी निदर्शनास आल्याने या सर्वांचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून वेलनेसला कारणे दाखवा नोटीस पाठविल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवालामध्ये कोणत्या बाबी नमूद केल्या आहेत व त्यात दोषी आढळलेल्या व्यक्ती व संस्थेविरोधात कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.```

(२) व (३)३ हे अंशत: खरे आहे.` सदर दुकानाची तपासणी ही दुष्यंत भामरे, सहआयुक्त, नाशिक

यांनी केलेली नसून त्यांच्या कार्यालयातील औषध निरीक्षकांनी दिनांक ८/७/२०१५ रोजी तपासणी केली होती. ी तपासणीत आढळलेल्या त्रुटींबाबत १७/७/१५ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यावरर पेढीने सादर केलेला खुलासा व वैयक्तिक सुनावणीच्या वेळी सादर केलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन सदर पेढीस चार दिवस (दि.७/१२/१५ ते १०/१२/१५) परवाने निलंबन करुन पेढी बंद ठेवण्याची शिक्षा देण्यात आली आहे.`

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील व्यापाऱ्यांकडे जप्त केलेला अन्नधान्य साठा

(६०) * ц३४९४७ цц श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील २१ व्यापाऱ्यांनी जादा अन्नधान्य साठा केल्याप्रकरणी त्यांच्याकडील २८३ क्विंटल सर्व प्रकारच्या डाळी व इतर ८४ क्विंटलल धान्यसाठा ा प्रशासनाने जप्त केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अन्नधान्याची साठेबाजी करणाऱ्या सदर व्यापाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) अंशत: खरे आहे.

जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ मधील तरतूदीनुसार जीवनावश्यक वस्तुंच्या साठेबाजी व काळयाबाजारास आळा बसण्यसाठी तहसिलदार, उमरी यांनी तालुक्यात २१ ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. धाडीद्वारे जप्त केलेला साठा हा साठवणुक परवान्यानुसार केलेला ा असल्याने तपासणीअंती तो संबंधीत व्यापाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आला. तसेच, साठेबाजी न करण्याबाबत व परवाना नूतनीकरणाबाबत व्यापाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

(६१) * ц३२३३१ цц श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छ भारत अभियानांतर्गत गत सहा महिन्यात ३५० कोटी रुपये खर्च करुन तब्बल ४ लाख ५७ हजार शौचालये बांधण्यात आली. मात्र शौचालयाच्या कामात अनियमितता ा वव गैरव्यवहार झाल्याने सदर कामाचा लेखाजोखा करणे व शौचालयाच्या कामाची तपासणी करणार असल्याचे मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी घोषणा केली असल्याची बाब दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांची तपासणी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीला तपासणीसाठी ी कालावधी निश्चित करुन दिलेला आहे काय, त्याचा

तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागात गत सहा महिन्यात म्हणजेचच माहे मे, २०१५ ते माहे ऑक्टोबर, २०१५ अखेरपर्यंत २,७५,९०१ वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम झाले असून त्यासाठीच्या ा प्रोत्साहनन
अनुदानासाठी रु.२७१.२१ कोटी निधी खर्च झाला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भ ावत नाही

शालेय शिक्षण विभागाने जिल्हा परिषद शाळांमध्ये अग्निशमन यंत्र बसविण्यासाठी निविदा प्रक्रीयेचा अवलंब न केल्याबाबत

(६२) * ५२९९९३ ५५प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद शाळांमध्ये अग्निशमन यंत्र बसविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने निविदा प्रक्रीयेचा अवलंब न करता सुमारे १९१ कोटी रुपयांची अग्निशमन यंत्रे खरेदीचा प्रस्ताव तयार केला व सदर प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी गेला असता वित्त विभागाने या नियमबाह्य प्रस्तावास तीव्र स्वरुपाचा आक्षेप घेऊन प्रस्ताव अमान्य करुन चुकीच्या पध्दतीने ही खरेदी होत असल्यामुळे या सगळ्या प्रकरणाची चौकशी करावी अशी शिफारस वित्त विभागाने माहे जून , २०१५ च्या सुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाने कोणत्या मुद्द्यासंदर्भात चौकशी करण्याच्या शिफारशी केलेल्या आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी ी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) वित्त विभागाने चौकशी करण्याबाबत निर्देश दिलेले नाहीत. या प्रकरणी ी शालेय शिक्षण विभागाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

मौजे होडखाड (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथील पाणीयोजनेचे

काम ९ वर्षापासून अपूर्ण असलेबाबत

(६३) * u२८४७६ uu**श्री.भास्कर जाधव (गुहागर)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे होडखाड (ता. खेड, रत्नागिरी) या गावच्या पाणी योजनेचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असून गेली ९ वर्ष होऊनही अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याच्या साठवण टाकीतून पूर्णपणे गळती होत असून सदर काम अपूर्ण असताना शासनाकडून ठेकेदाराला सुमारे ९० टक्के बिलाची रक्कम अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास अधीक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.`

(४) मौजे होडखाड नळ पाणी पुरवठा योजना (ता. खेड जि. रत्नागिरी) ी या योजनेच्या समाविष्ठ उपांगापैकी गुरुत्व वाहिनी, वितरण व्यवस्था व दोन साठवन टाक्याचे कामे पुर्ण झाली आहेत. त्यापैकी एक साठवण टाकी नादुस्त झाली असून त्याची दुरुस्ती ग्रामपंचायत स्तरावर करण्यात आली आहे. सदर योजनेव्दारे सर्व वाड्यांना पुरेशा दाबाने व सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु आहे. बंधा-याकरीता जागा उपलब्ध नसल्याने काम करण्यात आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

ठाणे जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या २ अभियंत्यांना लाच स्विकारताना झालेली अटक

(६४) * u२८९४६ uu**डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाच्या २ अभियंत्यांनी विहीर बांधकामाच्या तांत्रिक मंजुरीच्या शिफारशीसाठी आलेले ७ प्रस्ताव मंजूर करण्यासाठी बांधन गावचे उपसरपंचाकडे मागितलेली लाच स्वीकारताना माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी ी उक्त अभियंत्यांना अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे काय व त्यांची चौकशी लाचलुचपत विभागाने पूर्ण करून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

(२) होय.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वसई (जि.पालघर) तालुक्यातील पुरवठा विभागातील गैरकारभार व पुरवठा अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत असलेला धान्य व रॉकेलचा काळाबाजार

(६५) * u३१२१२ uuश्री.नसीम खान **(चांदिवली)**, श्री.अब्दुल सत्तार **(सिल्लोड)**, श्री.अस्लम शेख (मालाड **पश्चिम)**, श्री.अमिन पटेल **(मुंबादेवी)**, श्री.किसन कथोरे **(मुरबाड)**, श्री.पांडुरंग बरोरा **(शहापूर)**, श्री.संजय केळकर **(ठाणे)**, श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा **कळवा)**, श्री.सुरेश लाड **(कर्जत)**, श्री.शशिकांत शिंदे **(कोरेगाव)**, श्री.जयंत पाटील **(इस्लामपूर)**, श्री.हसन मुश्रीफ **(कागल)** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे शासनामार्फत गरिबांसाठी पुरवण्यात येणारे स्वस्त दरातील तांदूळ व रॉकेलसाठा परस्पर काळ्याबाजारात जास्त दराने विक्री करुन जीवनावश्यक वस्तूंचा अपहार केल्याचे निदर्शनास आल्याने पुरवठा अधिकाऱ्यांनी शांतीनगर पिराणीपाडा येथील स्वस्त धान्य दुकानदाराच्या विरोधात पोलिस ठाण्यात अपहाराचा गुन्हा दाखल केला असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच वसई (जि.पालघर) तालुक्यात पुरवठा अधिका-यांच्या संगनमताने धान्य आणि रॉकेलचा काळा बाजार होतत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच वसई कार्यालयातील पुरवठा विभागाच्या गैरकारभाराविरोधात सामाजिक कार्यकर्त्यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त ठिकाणी होत असलेला धान्य व रॉकेलचा काळा बाजार बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच वसई कार्यालयातील पुरवठा विभागातील संबंधितांवर वव पुरवठा अधिका-यांवर कोणती ी कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.

संबंधित अधिकृतत शिधावाटप दुकान क्र. ३७ फ १८१ च्या दुकानदारावर शांतीनगर पोलिस स्टेशन, भिंवडी येथे गुन्हा नोंद क्र. ॥१२३/२०१५ दिनांक ७/८/२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सामाजिक कार्यकर्त्याकडून आंदोलन करण्यात आले होते, त्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी केली असता, सदर तक्रारीत तथ्य नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सापे (ता.महाड, जि.रायगड) येथे ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून नवीन पाईप लाईन टाकण्याबाबत

(६६) * u३८४२२ uu**श्री.भरतशेठ गोगावले (महाड)** : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सापे (ता.महाड, जि.रायगड) येथे पाणी पुरवठ्यासाठी २० वर्षापूर्वी टाकण्यात आलेली पाईप लाईनची जीर्ण अवस्था झाली असून त्याद्वारे दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने तेथील ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाला नवीन पाईप लाईन मिळण्याकरिता ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून तसा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित ग्रामस्थांनी शासनाकडे पाठविला असतानाही अद्यापपर्यंत उक्त प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर त्वरित कार्यवाही करुन सदरील गावासस ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून नवीन पाईप लाईन टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच साधारणत: केव्हापर्यंत उक्त काम पूर्ण होणे अपेक्षित आहे?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) व (३) सापे (ता. महाड, जि. रायगड) येथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना घेण्याबाबत दि.१७ जुलै, २०१४ रोजी जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव प्राप्त झाला असून रु. ५४.९४ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रायगड यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे. मात्र सापे (ता. महाड, जि. रायगड) या गावाचा समावेश सन २०१५-१६ च्या वार्षिक कृती आराखड्यात असून त्यास अद्यापपर्यंतत मंजूरी मिळालेली नसल्याने पुढील कार्यवाही करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील पदवी महाविद्यालयातील पीएचडी विद्यार्थ्यांचे गाईडबाबत

(६७) * u३८४१२ uu**श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.योगेश सागर (चारकोप)** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पदवी महाविद्यालयातील पूर्णवेळ प्राध्यापकांनाच पीएचडी विद्यार्थ्यांचे गाईड बनण्यास परवानगी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निकष न पाळता अनेक कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राध्यापकही पीएचडी गाईड बनले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा गाईडच्या अधिपत्याखाली करण्यात आलेली पीएचडी ग्राह्य धरली जाणार नसल्याने हजारो विद्यार्थ्यांची ी पीएचडी धोक्यात येणार असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार सदर प्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली व हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली ी वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

महालक्ष्मी (मुंबई) येथील मास्टर टोबॅको या कंपनीमधून होणारे प्रदूषण

(६८) * u२९५८२ uuश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालक्ष्मी (मुंबई) येथील मास्टर टोबॅको या कंपनीमध्ये बेकायदा सिगारेट बनविण्याचे काम होत असून तंबाखूचा वास व धुरामुळे स्थानिक नागरिकांना मोठया प्रमाणावर प्रदूषणाचा ा त्रास होत असूनन सदर कंपनीवर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नगरसेवक व स्थानिक नागरिकांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पालिकेच्या आयुक्त, जी/दक्षिण विभाग कार्यालय, मा.मुख्यमंत्री, सचिव, पर्यावरण विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे अंशत: खरे आहे. स्थानिक नगरसेविका व तत्कालिन प्रभाग समिती अध्यक्षा, श्रीमती रत्ना महाले यांनी ी मास्टर टोबॅको कंपनीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे तक्रार केली होती.

(२) मे. मास्टर टोबॅको या कंपनीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

१) मे. मास्टर टोबॅको /मे. लक्ष्मी वेंचर्स या कंपनीने` त्यांच्या कार्यालयालगतच्या रिक्त भुभागावर पत्रे लावून केलेल्या अनधिकृत बांधकामावर महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र प्रांतिक नगर रचना अधिनियमांतर्गत कलम ५५ अन्वये दि. २३/०९/२०१५ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणात मा. शहर दिवाणी न्यायालयाने दावा क्र. ११२२१/२०१५ अंतर्गत स्थगन आदेश दिलेला आहे.

२) सदर कंपनीने त्यांच्या कार्यालयात केलेल्या अंतर्गत/बाहय फेरफारास मुंबई महानगरपालिका

कायदा कलम ३५१ अंतर्गत दि. २९/०९/२०१५ रोजी नोटीस बजाविण्यात आलेली आहे, सदर नोटीसीच्या अनुषंगाने पक्षकाराने सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन पुढीलल कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच, सदर बाबतीत महापालिकेमार्फत मा. शहर दिवाणी न्यायालयात पुर्वसुचनात्मक दावा (कॅविएट) दाखल करण्यात आला आहे.

३) मे. मास्टर टोबॅको या कंपनीवर महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खात्यामार्फत महानगरपालिका अधिनियम कलम ३९४/७४१ अंतर्गत मा. महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात क्र.००४२५३२ आणि ००४२५३३ अन्वये दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

४) तसेच सदर ठिकाणी अनधिकृतपणे सुरु असलेल्या कारखान्या विरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कारखाने विभागाने मा. महानगर दंडाधिकारी ४१ वे न्यायालय, शिंदेवाडी यांच्या न्यायालयात क्र.४१०७२२५/एसएस अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे.

(३) प्रश्नन उद्‍भवत नाही.

मौजे आजमाई व्हरवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील पेयजल योजनेतील अपहाराबाबत

(६९) * ५३०५७८ ५५श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आजमाई व्हरवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील पेयजल योजनेसाठी रुपये ४२ लाखांचा निधी मिळूनही सदर योजना अद्याप अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर पेयजल योजनेत साडेतेरा लाखांचा अपहार झाल्याप्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर योजनेतील अपहाराबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर योजना तातडीने पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेमार्फ़त चौकशी सुरू आहे. चौकशीअंती पुढील कारवाई करण्यात येईल.

(४) सद्य:स्थितीत योजनेतून गावास पाणीपुरवठा सुरु केला आहे. उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण होताच योजनेची उर्वरित कामे पूर्ण करण्यात येतील

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

यशवंतराव चव्हाण विद्यापीठात निकषांना डावलून अपात्र प्राध्यापकांची नेमणूक केली असल्याबाबत

(७०) * uu३०५२४ uu**श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्राध्यापकांच्या नेमणुका विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे होणे आवश्यक असतानाही, विद्यापीठाने प्राध्यापकांच्या स्थायी पदांवर नेमणूका केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात असंख्य पात्र व नेट/सेट उत्तीर्ण उमेदवार असतानाही विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषांना डावलून अपात्र प्राध्यापकांची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनीधी तसेच अनेक प्राध्यापकांनी मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य, मा. उच्च शिक्षण मंत्री, प्रधान सचिव यांना दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी पत्राद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अध्यापकांच्या नियुक्त्या ह्या विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषद व तंत्र शिक्षण परिषद यांनी ठरवून दिलेल्या व निर्धारित केलेल्या निकषांनुसार केलेला आहेत. सदर नियुक्त्या ह्या विहीत पध्दतीने जाहिराती देऊन व निवड समितीच्या शिफारशीनुसार व विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेनुसार केलेल्या आहेत.

(३) व (४) स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबदलल संचालक, उच्चच शिक्षण, महाराष्ट्रर राज्य, पुणे` यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भ ावत नाही.

पिंपळगांव मोर (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

(७१) * uu३६७०० uu**श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी-सिन्नर-शिर्डी या रस्त्यावर असलेल्या ा पिंपळगांव मोर (ता.इगतपुरी, जि. नाशिक) या गावासाठी सुमारे पन्नास लाख रुपये खर्च करुनही पाणीपुरवठा योजना कार्यान्वित न झाल्याने गावाला पावसाळ्यातही भीषण पाणीटंचाईचा सामना करावा ा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचे काम रखडल्याने उक्त गावाच्या पाणीपुरवठ्याकरिता संबंधितांकडे

वारंवार निवेदने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) व (३) योजना ऑगस्ट, २०१४ पासून कार्यान्वित करण्यात येवून पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आलेला आहे. योजनेचे काम रखडलेले नसून गावात पाणी टंचाई भासत नाही. तथापि गावातील अंतर्गत वादामुळे योजनेतील उपांगाची वारंवार तोडफोड करुन नादूरुस्त केली जातात. त्यामुळे वारंवार पाणी पुरवठा खंडीत होत असतो. पंरतू योजनेतील उपांगाची तात्काळ दुरुस्ती करण्यात येऊन पाणी पूरवठा सुरु करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात वैद्यकिय विभागातील रुग्णांना पुरेसे भोजन मिळत नसल्याबाबत

(७२) * ध३०९७८ धध श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात वैद्यकिय विभागातील रूग्णांना पुरेसे भोजन मिळत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्तत वैद्यकिय विभागाच्या पाकगृहासाठी ५२ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असतांना एकूण ३२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.` तथापि, उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने रुग्णांना सेवा पुरविण्यात येते.

(३) पाकगृहातील प्रमुख स्वयंपाकी, सहायक स्वयंपाकी इत्यादी वर्ग-४ संवर्गातील पदे मंजूर असून रिक्त पदे भरण्यावर शासन निर्बंध असल्याने सद्य:स्थितीत रिक्त पदे भरता येत नाहीत.त त्यामुळे सद्य:स्थितीत अन्य विभागातून वर्ग-४ कर्मचारी पाकगृहात उपलब्ध करुन देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

सक्करदरा, नागपूर येथील आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयाच्या २१ हजार स्क्वे.फुट जागेवर झालेले अतिक्रमण

(७३) * ध३२५३५ धध श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील सक्करदरा येथील आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयाच्या २११ हजार स्क्वे.फुट जागेवर अतिक्रमण करुन दुकाने थाटलेली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमीत दुकाने हटविण्याची नोटीसस उक्त आयुर्वेदीक महाविद्यालयाने देवून दीड वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप जागा मोकळी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदर जागा मोकळी करण्यासंदर्भातत शासनाने` कोणती कार्यवाही ी केली ी वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही, तथापि, शासन निर्णय दि .२०.१०.२०१४ अन्वये चिल्लर दुकानदार कल्याण संस्थेला दुकानाचे पुनर्वसन करण्यासाठी काही अटींचे अधिन राहून २१००० चौ.फुट इतकी जागा उपलब्ध करुन दिली होती. त्यामुळे याला अतिक्रमण म्हणता येणार नाही.

(२) मा.उच्च न्यायालयामधील याचिका क्रं.११४८/१२ मध्ये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर, यांनी दि.५.४.२०१४ अन्वये शासनाने दिलेली जागा शासनाकडे परत करण्यास कळविले आहे.

(३) व (४) चिल्लर दुकानदार संस्था यांनी उपरोक्त नोटीशीच्या अनुषंगाने शासनाचे विरोधात उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रं.२१७०/१४ दाखल केली यामध्ये दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात खाजगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांनी २०६ विद्यार्थ्यांना नियमबाहय प्रवेश दिल्याबाबत

(७४) * ---३१४८० ---**श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष दानवे (भोकरदन)** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ मध्ये खाजगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांनी सदोषपणे गुणवत्ता डावलून प्रवेश दिल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विद्यालयांनी ी सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात सुमारे २०६ विद्यार्थ्यांना नियमबाहय प्रवेश दिल्यामुळे प्रवेश नियंत्रण समितीने संबंधित महाविद्यालयांना सुमारे ४१ कोटी रुपयांचा दंड ठोठावला असून मुदतीत दंड न भरल्यास संबंधित महाविद्यालयांना २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी संलग्नता देवू नये असेही समितीने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार असणा-या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई

केली वा करण्यात येत **आहे**,

(५) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) **होय**, हे खरे आहे.

(२) **होय**, हे अंशत: खरे आहे.

संबंधित महाविद्यालयांनी मुदतीत दंड न भरल्यास संबंधित महाविद्यालयांना **२०१६-१७** या शैक्षणिक वर्षात प्रवेशासाठी संलग्नता देवू नये असे समितीने आदेशात म्हटले आहे.

(३) **होय**, हे खरे आहे.

(४) या संदर्भात कायदेशीर बाबी पडताळून पाहण्यात येत असून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अहमदनगर येथील शासकीय गोदामातून धान्याचा होत असलेला काळाबाजार व नेवासा येथे निकृष्ट दर्जाचा गहू वाटपाकरिता आल्याबाबत

(७५) * u३४४८९ uuश्री.राहुल जगताप **(श्रीगोंदा)**, श्री.बाळासाहेब मुरकुटे **(नेवासा)** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील शासकीय गोदामातूनन स्वस्त धान्य दुकानातून वितरित करण्यासाठी निघालेले धान्य काळ्या बाजारात सर्रासपणे विकले जात असल्याचे सामाजिक कार्यकर्ते वसंत ढुबे यांनी जिल्हा पुरवठा **अधिकारी**, अहमदनगर यांच्या दिनांक १३ **जुलै**, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास **आणले**, हे खरे आहे **काय**,

(२) तसेच नेवासा (जि.अहमदनगर) येथे चार वाहनांद्वारे शिधापत्रिका धारकांना वाटपासाठी गहू आला असता सदर गव्हाची स्थानिक **लोकप्रतिनिधी**, नेवासा व इतर प्रतिनिधींनी तपासणी केली असता गहू निकृष्ट दर्जाचा असल्याचे निदर्शनास आल्याने तसेचच निकृष्ट दर्जाचा गहू खाण्यायोग्य नसल्याचा अहवाल एफसीआयच्या अधिकाऱ्यांनी देऊन दि. १४ **जुलै**, २०१५ रोजी वा त्यासुमारास सदरर गहू परत पाठविण्यात आला अशा स्वरुपाच्या घटना दोन वेळेस घडल्याने शिधापत्रिका धारकांना रेशन दुकानावर गहू मिळाला **नाही**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, याबाबत चौकशी करण्यात आली आहे **काय**, चौकशीत काय आढळून आले **आहे**, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर तसेच अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत **आहे**,

(४) **असल्यास**, सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(५) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे आहे. याबाबतची तक्रार श्री वसंत ढुबे यांनी दि.०१.०७.२०१५ रोजी केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली असता, दि.३०.०६.२०१५ रोजी अहमदनगर जिल्हयातील भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून श्रीगोंदा शासकीय धान्य गोदामाकडे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे धान्य घेऊन निघालेली दोन वाहने नादुरूस्त झाल्याने वेळेत न पोहोचता तीन दिवस उशीराने भारतीय अन्न महामंडळाकडून उचल केलेल्या पूर्ण धान्यासह श्रीगोंदा येथील गोदामात पोहोचल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले आहे.

(२) हे खरे नाही. दि. १४ जुलै, २०१५ रोजी नेवासा येथील गोदामपालाने भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून आलेल्या प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठीचा गहू असलेली तीन वाहने त्यातील धान्य खराब असल्याचे वाहतूक प्रतिनिधी यांना कळवून सदर वाहने परत पाठविली. त्या धान्याची जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी, वाहतूक प्रतिनिधी तसेच, भारतीय अन्न महामंडळाच्या गुणनियंत्रक अधिकारी यांच्यामार्फत तपासणी केली असता, सदरहू गहू मानवास खाण्यायोग्य असल्याचे आढळून आल्याने सदर गहू नेवासा शासकीय गोदामात दि.१६ जुलै,२०१५ रोजी परत पाठविण्यात आला. रास्तभाव दुकांनातून सदर गहू जुलै महिन्यात पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे.

(३) उपरोक्त श्रीगोंदा येथील प्रकरणात वाहतूकदारास दिलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने त्यांनी वाहने नादुरुस्त झाल्याने धान्य पोहोचण्यास विलंब झाल्याबाबत खुलासा सादर केला आहे. तसेच, उपरोक्त नेवासा प्रकरणात अनियमितता झाली नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) अन्नधान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हयामध्ये वाहतूक व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीअंतर्गत शासकीय गोदामातून रास्तभाव दुकानाकडे धान्य रवाना केल्यानंतर लगेचच त्या दुकानांच्या परिसरातील लोकांना Group SMS द्वारे दुकानामध्ये पोहोच होणाऱ्या धान्याच्या आकडेवारीची व वाहनांची माहिती शासकीय गोदामाकडून किंवा तालुका कार्यालयाकडून देण्यात येते.

सुधारित धान्य वितरण प्रणाली अंतर्गत अन्नधान्याची अफरातफर/काळाबाजार टाळण्यासाठी शासनाने अन्नधान्याची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना हिरवा रंग देण्याबाबत तसेच, विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या जिल्हयांमधील वाहनांवर प्रायोगिक तत्वावर GPS यंत्रणा बसविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत FAQ दर्जाचे अन्नधान्य पुरविण्याबाबत भारतीय अन्न महामंडळास शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य प्राप्त झाल्यास ते स्विकारण्यात येऊ नये व त्वरीत बदलून घेण्याबाबत सूचना शासनस्तरावरुन सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.ततततततत

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे उमरा (हिवरा खुर्द) (ता.खामगाव, जि.बुलढाणा) या गावातील
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

(७६) * ७३३२७७ ७७श्री.आकाश फुंडकर (खामगांव) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरा (हिवरा खुर्द) (ता.खामगाव, जि. बुलढाणा) या गावातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त ७झाल्या आहेत तसेच सदर काम निकृष्ट दर्जाचे झ ााल्यामुळे पाण्याची टाकी मोठ्या प्रमाणात गळत आहे, हे खरे आहे काय,

(२) **असल्यास**, या संदर्भात स्थानिक ग्रामस्थांनी तथा स्थानिक वि.प.स यांनी सदर गंभीर प्रकार उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांच्या निदर्शनास आणून **दिला**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, सदर कामाची तात्काळ तपासणी करून उच्च स्तरीय चौकशी करण्यात आली आहे **काय**,

(४) **असल्यास**, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत **आहे**,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

उमरा व हिवरा खु. या गावाकरीता सन **२००८-०९** मध्ये भारत निर्माण कार्यक्रमातुन योजना मंजूर **असून**, पाण्याची टाकी थोड्या प्रमाणात गळते.``

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

(४) टाकीची गळती थांबविण्याकरीता तांत्रिक सेवा पुरवठादार यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले **असून**, त्याकरीता ईपॉक्सी पेंटचे दोन कोट मारण्याचे समितीस सांगण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भ‌ावत नाही.

पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या हिंदी विभागात बनावट ओळखपत्राद्वारे विद्यार्थी विद्यापीठातील सोयीसुविधांचा लाभ घेत असल्याबाबत

(७७) * ५३३८१७ ५५श्री.दिलीप वळसे-पाटील **(आंबेगाव)**, श्री.दिपक चव्हाण **(फलटण)**, श्री.सुरेश लाड **(कर्जत)** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या हिंदी विभागात बनावट ओळखपत्राद्वारे विद्यार्थी विद्यापीठातील सोयीसुविधांचा लाभ घेत असल्याचे माहे **ऑगस्ट**, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास **आले**, हे` खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, उक्त प्रकरणी ी चौकशी करण्यात आली आहे काय व तद्नुसार बनावट ओळखपत्राआधारे विद्यापीठातील सोयीसुविधांचा लाभ अन्य विद्यार्थ्यांनी घेतला जावू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत **आहे**,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) याबाबत कुलगुरुंकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(२) व (३) सदर तक्रारीची शहनिशा करुन सत्यता पडताळण्यासाठी **कुलगुरु**, सावित्रीबाई फुले

विद्यापीठ, पुणे यांनी डॉ.अशोक चासकर, स.प.महाविद्यालय यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून सदर समितीचे कामकाज अद्याप सुरु आहे.

तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील
रासायनिक कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण

(७८) * ५३६६२८ ५५**श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर)** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखाने नियमितपणे वातावरणात विषारी वायू तसेच पाण्यात घातक रसायने सोडत आसल्याने तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून संपूर्ण परिसर प्रदूषित करणाऱ्या सदर कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीईटीपी प्रकल्प सदर कंपन्यांनी नियमित न राबवल्यामुळे प्रदूषणात वाढ होत असून जबाबदार असलेल्या किती कारखान्यांवर प्रदूषण मंडळाने कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कारवाईचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१)१हे खरे नाही.

(२) व (३) तळोजा येथील सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेमध्ये प्रक्रियाकृत केलेल्या सांडपाण्याचे पृथ:करण अहवाल विहित मर्यादित येत नसल्यामूळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा केंद्रासस दिनांक २४/०९/२०१५ रोजी त्यांच्यावर खटला का दाखल करु नये अशी नोटीस जारी करण्यात आली आहे.

सदर औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांनी संमतीपत्रामधील अटींचे उल्लघंन केले असता, त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस, प्रस्तावित आदेश तसेच उद्योग बंद करणे इ. प्रकारची कारवाई केली जाते. तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्ययावत करण्याकरीता बँक हमी घेतली जाते. सन २०१५ मध्ये एकूण ५३ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस व ३६ उद्योगांना प्रस्तावित आदेश देण्याची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यामध्ये शालेय आहार योजनेंतर्गत "सेंट्रलाईज किचन"
योजना सुरु करण्याबाबत

(७९) * ५३२३४६ ५५**श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर)** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय मुलांना स्वच्छ व पोषण आहार मिळावा तसेच आहार देण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांना अडकून पडावे लागत असल्यामुळे अध्यापनाचा वेळ वाया जात असल्याने मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला "सेंट्रलाईज किचन" योजना राबविण्याचे निर्देश देवूनही अद्याप सदर योजना सुरु करण्यात आली नसल्याची बाब माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास

आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुणे जिल्ह्यातील शाळांमध्ये पोषण आहार शिजवून देणाऱ्या बचत गटांना जुलै, २०१५ पासून मानधन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, केंद्र शासनाने शालेय मध्यान्ह भोजन योजनेत कर्नाटकच्या धर्तीवर क्षिरधारा ही योजना सुरु करण्याची सूचना सर्व राज्यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यामध्ये शालेय पोषण आहारात दुध देण्याबाबत व सेंट्रल किचन योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नागरी भागात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने दि.१८.०६.२००९ रोजी घेतलेला आहे. यानुसार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रिया राबवून केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करण्यासाठी संस्थाची निवड करण्यात आलेली आहे. तथापि, याबाबत न्यायालयीन बाबी उद्भवल्यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली अद्याप सुरु करता आलेली नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१७.०४.२०१५ च्या आदेशान्वये राज्य शासनाच्या बाजुने निर्णय दिलेला आहे. यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्यामध्ये कोणतीही कायदेशीर अडचण राहिलेली नाही. यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आठवडयातून एकदा दुध पुरविण्यासाठी निधी मंजुर करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आलेली होती. तथापि, केंद्र शासनाने सदर विनंती अमान्य केली आहे. तथापि, राज्य शासनामार्फत आठवडयातून एकदा शालेय पोषण आहार योजनेंतर्गत दुध भुकटी पुरविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

ब्रँडेड कंपन्यांच्या दुधाचे भाव कमी करण्याबाबत

(८०) * uu३२४१६ uuश्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रँडेड कंपन्यांच्या दुधाचे भाव लिटर मागे दोन-चार रुपयांनी कमी होतील अशी घोषणा मा. दुग्धविकास मंत्र्यांनी करुनही त्याची अंमलबजावणी माहे ऑगस्ट, २०१५ अखेर न झाल्याने किरकोळ विक्रेत्यांकडून दुध पिशव्यांच्या छापील किंमतीपेक्षा लिटर मागे दोन ते तीन रूपये ग्राहकांकडून जास्तीचे पैसे` घेण्याचे अजूनही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रमझान ईदच्या, दिवशी गोकुळ दुधकंपनीने एका दिवसात १३ लाख लिटर दुधाची विक्री जास्तीचे पैसे घेऊननकेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुधग्राहकांची होत असलेली पैशाची लूट थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट :

(१) दुध विक्री दरांवर बंधन घालण्याची कायदेशीर तरतूद नाही. ी तरीही मा. मंत्री (पदुम) यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी मुंबई विभागात मदर डेअरी या प्रकल्पाने दि. २९.०५.२०१५ पासून व महानंद दुग्धशाळा यांनी दि. १२.०६.२०१५ पासून प्रतिलिटर रु. २/- ने दुधाचे भाव कमी केलेले आहेत.

(२) **नाही**, हे खरे नाही. ी

रमजान ईदच्या दिवशी गोकुळ दुध कंपनीच्या आवेष्टित स्वरुपाच्या दुधाची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री होत असल्याबाबत कोणतीही तक्रार वैध मापन शास्त्र यंत्रणेकडे प्राप्त झालेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्रविधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती **मुद्रणालय**, नागपूर.